







# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा








रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ०७.०४.२०२६ | अंक नं. ००६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020










## बाजारपेठेतील अतिक्रमणे आणि बेशिस्त वाहनांवर होणार कारवाई, महापालिका आणि शहर वाहतूक शाखा सुरु करणार संयुक्त मोहीम



बाजारपेठेतील अतिक्रमणधारक व बेशिस्त वाहनचालकांना कारवाईचा इशारा देताना शहर वाहतूक शाखेची पोलिस व्हॅन.

नगर - शहराच्या मुख्य बाजारपेठेतील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी आता महापालिका आणि शहर वाहतूक शाखा ॲक्शन मोडमध्ये आली आहे. ६ एप्रिल रोजी सायंकाळी संयुक्तपणे राबवलेल्या मोहिमेत दुकानदार आणि अतिक्रमणधारकांना कडक शब्दांत तंबी देण्यात आली असून, आता थेट कायदेशीर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

बाजारपेठेत बेशिस्त पार्किंग आणि वाढत्या अतिक्रमणांमुळे नागरिक त्रस्त आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेने नो पार्किंग आणि नो हॉकर्स झोन प्रस्तावित केले आहेत. ६ एप्रिल रोजी महापालिकेचे वाहन जप्ती पथक आणि पोलिसांनी बाजारपेठेत फिरून दुकानदार, हातगाडी विक्रेते आणि वाहनचालकांना सूचना दिल्या. रस्त्यावर अडथळा ठरणारे साहित्य, दुकानाबाहेरील पुतळे तात्काळ हटवण्याचे आदेश देण्यात आले.

आज केवळ समज आणि नोटीस दिली आहे, मात्र उद्यापासून कोणत्याही प्रकारची सवलत न देता जप्तीची कारवाई केली जाईल, असे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले. काही भागात पे ॲंड पार्क योजनाही राबवली जाणार असून, वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी ही मोहीम अधिक तीव्र केली जाणार आहे. यामुळे बाजारपेठेतील रस्ते मोकळे होऊन सर्वसामान्यांचा प्रवास सुखकर होण्याची शक्यता आहे.

## अहिल्यानगर-मनमाड महामार्गावरील अवजड वाहतूक पर्यायी मार्गाने वळवली

### पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे आदेश

नगर - राहुरी बुद्रुक येथील ग्रामदैवत श्री खंडोबा देवस्थानच्या यात्रा उत्सवानिमित्त होणारी गर्दी आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलीस प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. ५ ते ९ एप्रिल या कालावधीत नगर-शिर्डी मार्गावरील अवजड वाहतूक अन्य मार्गांवर वळविण्याचे आदेश पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी निर्गमित केले आहेत.

यात्रेनिमित्त कावड, काठी मिरवणूक, बैलगाडा शर्यती, कुस्ती स्पर्धा आणि छबिना मिरवणूक असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या काळात भाविकांची मोठी गर्दी होणार असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी दुपारी ३ ते रात्री ११ वाजेपर्यंत अवजड वाहनांना प्रतिबंध घालण्यात आला आहे.


नगरकडून शिर्डी, मनमाड आणि धुळ्याकडे जाणारी वाहने आता विळद सर्कल, शेंडी बायपास, नेवासा फाटा आणि वैजापूर मार्गे जातील. तसेच मनमाडकडून येणारी वाहतूक पुणतांबा, तळेगाव दिघे आणि आळेफाटा मार्गे वळवण्यात आली आहे. संगमनेर आणि नाशिककडे जाणारी अवजड वाहने श्रीरामपूर, नेवासा आणि आळेफाटा मार्गे प्रवास करतील. सिन्नर-लोणी मार्गे येणाऱ्या वाहनांना संगमनेरमार्गे जावे लागेल. हे निर्बंध रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि शासकीय वाहनांना लागू राहणार नाहीत. नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन श्री. घार्गे यांनी केले आहे.





















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# राहुरीत शरद पवारांची दुहेरी चाल आणि विखेंची खेळी : बुमरँग कोणावर उलटणार

महाराष्ट्रात बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक होत आहे. बारामतीत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि राहुरीत आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनाने या निवडणुका होत आहेत. या दोन्ही निवडणुका सहानभूतीच्या पार्श्वभूमीवर बिनविरोध व्हाव्यात म्हणून सत्तारुढ महायुतीने सर्वतोपरी प्रयत्न करूनही तो राजकीय प्रयत्न सपशेल फेल ठरला. परिणामी लढतीला तोंड फुटले. राजकीय सहानभूती निर्माण करण्याच्या सत्तारुढ पक्षाच्या प्रयत्नांना तशी खिळ बसली. हा तसा सत्तारुढ भाजप-राष्ट्रवादी-शिवसेना महायुतीला मोठा राजकीय धक्का मानावा लागेल. या निवडणुका बिनविरोध झाल्या नाहीत. त्या एकतर्फी सुद्धा होणार नाहीत, असा मतदानापूर्वी अंदाज दिसतो. त्यातही राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत बारामतीपेक्षा राहुरीत प्रचंड चुरस निर्माण होईल. ही बाब राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी प्राजक्त तनपुरे यांची तळागाळातील भूमिका हेरून दोन एबी फॉर्म देऊन पडद्याआड गोविंद मोकाटे यांची उमदवारी निश्चित केली तर भाजपने तनपुरेंच्या माघारीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करून त्यांना जरूर रोखले. मंत्री विखेंची खेळी वरकरणी सफल झाल्याचे दिसत असले तरी राजकीय चुरस राष्ट्रवादी (शरद पवार) गटाचे उमेदवार गोविंद मोकाटे यांच्यामुळे कायम राहणार आहे. आता हे बुमरँग कोणावर उलटते हे मतपेटीद्वारे पुढे येईल पण ही निवडणूक सध्या तरी भाजपच्या अक्षय कर्डिले यांच्या उमेदवारीपेक्षाही प्राजक्त तनपुरे यांच्या नावाभोवती केंद्रित झाली ही बाब वृत्तपत्रातील बातम्यांवरून कोणाच्या निदर्शनास येईल तनपुरेंनी निवडणूक रिंगणातून बाहेर राहण्याचा निर्णय सत्तारूढ पक्ष आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दबावातून झाला ही बाब राजकीय निरीक्षकांच्या नजरेतून सुटणार नाही. या माघारीसाठी तनपुरेंना एवढी आश्वासने देण्यात आली आहेत. निवडून येणारा आमदार नामधारीच राहील. राहुरीचे सर्व प्रश्न प्राजक्त तनपुरे यांच्याच कलाने सोडवले जातील. त्यात ईडीचा धाक आणि अन्य दबावातून तनपुरेंची माघार झाली. तनपुरे यांनी भाजपला बाय दिला तरी त्यांना मानणाऱ्या मतदाराला हा निर्णय पचनी पडण्याऐवजी रोष निर्माण होताना दिसतो. त्यामुळे सहानभूती ऐवजी राजकीय चुरस निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यात यापूर्वी कर्डिले यांच्या नगर आणि पाथर्डी तालुक्यातील या मतदारसंघात प्रभाव असायचा आणि राहुरीत मतविभागणी व्हायची त्यातून ते आमदार होत होते. पण यावेळी प्रमुख राजकीय पक्षाचे दोन्ही उमेदवार कर्डिले आणि मोकाटे दोघेही नगर तालुक्यातील आहेत याचा निवडणूक निकालावर परिणाम होऊ शकतो.

### तनपुरेंचा पवित्रा हुकला

प्राजक्त तनपुरे यांनी निवडणूक लढवण्याची पूर्वतयारी केली होती. हिंदुत्वाच्या मुद्द्यावर त्यांनी प्रचारही सुरू करून अपक्ष उमेदवारीची तयारी चालवली होती. भाजपचे उमेदवारीसाठी व्युहरचना केल्याचे जाणवत होते, तशी मतदारसंघात चर्चा होती. संगमनेर पॅटर्न राहुरीत राबवला जाणार याची कुणकुण होतीच. ज्यांनी त्यांना तसे आश्वासित केले त्यांच्या फोनमुळेच त्यांना माघार घ्यावी लागली असणार हा राजकीय पवित्रा हुकल्यामुळे त्यांच्या राजकीय अडचणी भविष्यात वाढणार आहे. राहुरी विधानसभा मतदार संघात कर्डिलेंच्या सहानुभूतीपेक्षाही तनपुरेंची लाट होती. म्हणून भाजपाने त्यांना रिंगणाबाहेर ठेवण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. त्यात भाजपाचा साध्य झाला असला तरी तनपुरे यांची राजकीय पिछेहाट झाली या निवडणुकीत कोणी आमदार झाले तरी तनपुरे यांना स्पर्धक निर्माण होणार आणि पुढल्या निवडणुकीत त्यांचे आव्हान राहणार आहे. म्हणूनच तनपुरेंचे मतदार भाजपकडे झुकण्याची शक्यता धुसर होते.

### का.ल. पवारांची पुनरावृत्ती?

पुढच्या निवडणुकीत मतदारसंघाची पुनर्रचना होईल, त्यावेळी राहुरीला कोणता भाग जोडला जाईल हे गुलदस्त्यातच आहे पण या पोटनिवडणुकीने तनपुरेंना स्पर्धक निर्माण होईल परिणामी तनपुरेंना जपून राजकीय चाल करावी लागणार आहे तशी दक्षता घेतली नाही तर शरद पवार यांनी त्यांची समाजवादी काँग्रेस असताना बारागाव नांदूरचे का.ल. पवार यांना तनपुरे यांच्या विरुद्ध लढवून आमदार केले होते, हा इतिहास दुर्लक्षून चालता येणार नाही. वास्तविक १९८५ मध्ये प्रसाद तनपुरे यांनी अपक्ष लढून जे साध्य केले तीच अपेक्षा प्राजक्त तनपुरे यांनी अपक्ष लढण्याबाबत होती सहानुभूतीपेक्षा तनपुरे लाट मोठी होती म्हणूनच त्यांना रिंगणाबाहेर ठेवण्यात आले पण हा राजकीय हेतू साध्य होणार का याचे बूमरँग कोणावर उलटणार हे मतपेटीतूनच पुढे येईल तोपर्यंत प्रतीक्षा करावी लागेल. पण या निमित्ताने बारामती पेक्षा शरद पवार यांनी राहुरीत दोन ए बी फॉर्म देऊन दुहेरी चाल केली ती यशस्वी ठरली.

– रामदास ढमाले

## घरासमोर ओट्यावर झोपलेल्या महिलेचे दागिने चोरट्यांनी पळविले

नगर – नगर तालुक्यातील पिंपळगाव कौडा येथे घरासमोर झोपलेल्या एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्यांनी बळजबरीने हिसकावून चोरून नेल्याची घटना ६ एप्रिल रोजी पहाटे अडीच वाजेच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत आशाबाई मच्छिंद्र सकट (वय ५३, रा. पिंपळगाव कौडा, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी महिला आणि त्यांचे पती घरासमोर झोपलेले होते. ६ एप्रिल रोजी पहाटे अडीच वाजेच्या सुमारास अज्ञात चोरटे त्या ठिकाणी आले. त्यांनी फिर्यादीच्या गळ्यातील १० हजार रुपये किमतीचे दोन ग्रॅम सोन्याचे मणी मंगळसूत्र आणि २० हजार रुपये किमतीचा ४ ग्रॅम वजनाचा सोन्याचा बदाम असा एकूण ३० हजार रुपयांचा मुद्देमाल बळजबरीने ओढून नेला.

या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांनी घटनास्थळी भेट दिली. ठसे तज्ज्ञांनाही पाचारण करण्यात आले होते. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९(६), ३(५) प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक फौजदार डावखर करत आहेत.

# अहिल्यानगर शहर परिसरात दुसऱ्या दिवशीही चेन स्नॅचिंग

### बुरुडगाव रोडवर महिलेची ५ तोळ्यांची मोहनमाळ दुचाकीस्वाराने पळविली

नगर – छत्रपती संभाजीनगर रोड वरील इंद्रायणी हॉटेल पाठीमागील रस्त्यावर ५ एप्रिल रोजी दुपारी पायी चाललेल्या महिलेला धमकावून सोन्याचे दागिने पळवून नेल्याची घटना ताजी असतानाच ६ एप्रिल रोजी सायंकाळी बुरूडगाव रोडवर पुन्हा चेन स्नॅचिंगची घटना घडली आहे. अज्ञात दुचाकीस्वाराने रस्त्याने पायी चाललेल्या महिलेच्या गळ्यातील ५ तोळे वजनाची सोन्याची मोहनमाळ हिसकावून नेली आहे.

याबाबत विवेक पांडुरंग खाकाळ (वय ३९, रा. शिवाजी सोसायटी, बुरूडगाव रोड) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची आई कृपाला पांडुरंग खाकाळ या घरासमोरील गल्लीत पायी फिरण्यासाठी गेल्या होत्या. यावेळी मोटारसायकलवरून आलेल्या एका अनोळखी इसमाने, ज्याने अंगात काळे जॅकेट आणि डोक्यावर हेल्मेट घातले होते, त्याने वृद्ध महिलेच्या गळ्यातील ५ तोळे वजनाची सोन्याची मोहनमाळ काही समजण्यापूर्वीच हिसकावून पळ काढला. भरवस्तीत घडलेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे आणि कोतवालीचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. फिर्यादी विवेक खाकाळ यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०४ (२) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील आणि शीतल मुगडे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. आरोपीचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले जात आहे.

# मुख्य जलवाहिनी 'लिकेज' झाल्याने नगर शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत

नगर – महापालिकेची शहर पाणी पुरवठा योजनेची ११०० एम.एम व्यासाची मुख्य जलवाहिनी ७ एप्रिल रोजी सकाळी लिकेज झाल्याने शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगर भागास उशिराने व कमी दाबाने पाणी पुरवठा होणार असल्याची माहिती पाणी पुरवठा विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

७ एप्रिल रोजी सकाळी शहर पाणी पुरवठा योजनेची ११०० एम.एम व्यासाची मुख्य जलवाहिनी नांदगाव शिवारात देवनदी जवळ जाधव यांच्या शेतामध्ये हवेच्या व पाण्याच्या दाबाने जॉईंट लिकेज झालेली आहे. सदरहू पाणी गळती होत असलेल्या ठिकाणी मोठया प्रमाणावर पाणी वाया जात असल्याने सदरहू जलवाहिनीद्वारे मुळानगर येथून होणारा पाणी उपसा त्वरित बंद करून तातडीने जलवाहिनी दुरूस्तीचे काम हाती घेतलेले आहे. परंतू जलवाहिनी दुरूस्ती कामाच्या ठिकाणी असलेली भौगोलिक परिस्थिती व तांत्रिक अडचणीमुळे जलवाहिनी दुरूस्ती कामात विलंब होणार आहे.

मुख्य जलवाहिनी लिकेज झाल्याने व दुरूस्ती कामासाठी सदर जलवाहिनीद्वारे होत असलेला पाणी उपसा बंद ठेवण्यात आल्याने शहर पाणी वितरण व्यवस्थेच्या टाक्या पूर्ण क्षमतेने व निर्धारित वेळेत भरणे शक्य होणार नाही. त्यामुळे आज ७ एप्रिल रोजी रोटेशन नुसार पाणी वाटप सुरू असलेल्या बोल्हेगाव, नागापूर, सावेडी उपनगरातील पाईप लाईन रोड, ढवणवस्ती परिसर, वैदवाडी इत्यादी भागाचा पाणी पुरवठा बंद राहणा असून या भागास ८ एप्रिल रोजी पाणी वाटप करण्यात येईल.

तसेच ८ एप्रिल रोजी रोटेशन नुसार पाणी वाटपाच्या शहराच्या मध्यवर्ती भागास म्हणजेच मंगलगेट, रामचंद्रखुंट, झेंडीगेट, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, दाळमंडई, काळू बागवान गल्ली, धरती चौक, बंगाल चौकी, माळीवाडा, कोठी या भागात व गुलमोहर रोड, प्रोफेसर कॉलनी परिसर, सिव्हील हाडको, प्रेमदान हाडको, टी.व्ही. सेंटर परिसर, म्युनिसीपल हाडको, स्टेशन रोड, आगरकर मळा, विनायकनगर इत्यादी भागास उशिराने व कमी दाबाने पाणी पुरवठा होणार आहे. तरी नागरीकांनी याची नोंद घेवून असलेल्या पाण्याचा वापर काटकसरीने करून महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी ३० उमेदवारांचे ४२ अर्ज दाखल, छाननीत ७ अर्ज बाद

नगर – राहुरी विधानसभा पोटनिवडणुक न लढविण्याचा निर्णय राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी घेतल्यानंतर राष्ट्रवादीने माजी पंचायत समिती सदस्य गोविंद मोकाटे यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत भाजपाचे अक्षय कर्डिले, राष्ट्रवादीचे मोकाटे, उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रावसाहेब खेवरे (अपक्ष), वंचित बहूजन आघाडीचे उमेदवार संतोष चोळके, शिवसेना शिंदे गटाचे रवींद्र मोरे (अपक्ष) यांच्या सह ३० उमेदवारांचे ४२ अर्ज दाखल झाले आहेत. दरम्यान ७ एप्रिल रोजी झालेल्या छाननीत ७ उमेदवारांचे अर्ज बाद झाले आहेत.

मोकाटे गोविंद खंडु २ अर्ज, अपक्ष / नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार, अल्ताफ इब्राहिम शेख १ अर्ज अपक्ष, बिलाल गफूरभाई शेख १ अर्ज अपक्ष, उमेश महादेव म्हेत्रे १ अर्ज अपक्ष, लांबे सुर्यभान दत्तात्रय २ अर्ज, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस/अपक्ष, रावसाहेब सदाराम खेवरे १ अर्ज अपक्ष, अक्षय शिवाजीराव कर्डिले ४ अर्ज भारतीय जनता पार्टी, संभाजी लक्ष्मण धोंडे २ अर्ज अपक्ष, जाधव नागेश विलास १ अर्ज अपक्ष, मोरे रविंद्र बापुसाहेब १ अर्ज अपक्ष, देशमुख इम्रान नबी १ अर्ज अपक्ष, जाधव बाळासाहेब सोमा २ अर्ज वंचित बहजन आघाडी/अपक्ष, चोळके संतोष एकनाथ २ अर्ज वंचित बहुजन आघाडी/अपक्ष, दत्तात्रय नारायण म्हैस १ अर्ज अपक्ष, कांबळे त्रिशला मिलिंद १ अर्ज अपक्ष, शिवाजी आनंदा कदम २ अर्ज अपक्ष, बर्डे सखाहरी शांताराम १अर्ज अपक्ष, प्रविण सुभाष दळवी १ अर्ज अपक्ष, पवार नामदेव बंडू १ अर्ज अपक्ष, अनिल भिकाजी जाधव १ अर्ज अपक्ष, शितोळे सुदर्शन लक्ष्मण २ अर्ज अपक्ष/हिंदू एकता आंदोलन, कोळसे बाळु बापुराव १ अर्ज अपक्ष, साहेबराव पाटीलबा म्हसे १ अर्ज अपक्ष, अथर्व साहेबराव म्हसे २ अर्ज अपक्ष /भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, खेमनर नंदकुमार भागवत १ अर्ज अपक्ष, हापसे महेश केशव १ अर्ज अपक्ष, सोहम बापूसाहेब चिंधे २ अर्ज लोकशाही पार्टी / अपक्ष, प्रतिमा किशोर देसर्डा १ अर्ज अपक्ष, शेटे सविता रामचंद्र १ अर्ज अपक्ष, शोएब सुभेदार शेख १ अर्ज अपक्ष असे उमेदवारी अर्ज दाखल झाले आहे.


दाखल उमेदवारी अर्ज माघारीची मुदत ९ एप्रिल असून या दिवशीच निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे. ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी भाजपाचे प्रयत्न सुरु असून त्याचाच एक भाग म्हणून तनपुरे यांना निवडणूक न लढविण्याचे आवाहन भाजपा नेत्यांनी केले. त्यात ते यशस्वीही झाले. मात्र राष्ट्रवादी शरद पवार गटाने दुसरा डाव टाकत गोविंद मोकाटे यांना उमेदवारी दिली आहे. तसेच कर्डिले व मोकाटे यांच्या व्यतिरिक्त आणखी २८ उमेदवारांनी अर्ज दाखल केलेले आहेत. त्यामुळे ही निवडणूक बहुरंगी होणार की, बिनविरोध करण्यात भाजपाचे नेते यशस्वी होतात हे ९ एप्रिल रोजी दुपारी स्पष्ट होणार आहे. निवडणूक झाल्यास प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया २३ एप्रिल रोजी पार पडणार असून, ४ मे रोजी मतमोजणी होऊन निवडणुकीचा निकाल स्पष्ट होईल. तसेच ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ६ मे पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## राहत्या घरात गळफास घेत एकाची आत्महत्या

नगर – राहत्या घरात गळफास घेत ४७ वर्षीय व्यक्तीने आत्महत्या केल्याची घटना भिंगार च्या आलमगीर परिसरातील मिलिंद कॉलनी येथे ६ एप्रिल रोजी सकाळी ७.३० च्या सुमारास उघडकीस आली आहे. सुनिल बबन मदने (वय ४७, रा. मिलिंद कॉलनी , आलमगीर, भिंगार) असे मयताचे नाव आहे.

सुनिल मदने यांनी गळफास घेतल्याचे निदर्शनास आल्यावर त्यांना त्यांचे नातेवाईक विजय बुलाखे यांनी उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ.खराडे यांनी त्यांना तपासून उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबतच्या अहवालावरून भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत मदने यांच्या पश्चात आई, भाऊ, भावजय, पत्नी, १ मुलगी असा परिवार आहे. मयत सुनिल मदने यांच्यावर त्यांचे मूळगावी राळेगण म्हसोबा, ता.नगर) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## शेषमल गुगळे यांचे संथाराव्रतात निधन



नगर – समृध्दीनगर वाकोडी रोड भोसले लॉनजवळ रहिवाशी शेषमल धोंडीराम गुगळे (टाकळी हाजीवाला) (वय ८४) यांचे ७ एप्रिल रोजी संथाराव्रतात निधन झाले. अंत्यस्कार अहिल्यानगर येथील नालेगाव अमरधाम येथे करण्यात आले. राजेश गुगळे, सुनिता भंडारी, स्मीत मुनोत यांचे ते वडील होत. त्यांच्यामागे एक मुलगा, दोन मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

## राजाराम गालपेल्ली यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – किसनगिरीनगर येथील हापसे कॉर्नर, मल्हार अपार्टमेंट मधील रहिवासी राजाराम भुमय्या गालपेल्ली (वय ८८) यांचे ६ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, सुन, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कृष्णाहरी गालपेल्ली यांचे ते वडील होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गॅसचा तुटवडा नाही तर काळाबाजार कसा होत आहे?

नगर – जगात इराण विरुद्ध अमेरिका इस्राईल युद्ध चालू असल्याने इराणने स्ट्रेट हार्मोज बंद केल्यामुळे पूर्ण जगात तेलाच्या वाहतुकीवर प्रतिबंध लागले आहे. नगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी आपल्याकडे मुबलक साठा आल्याचं दावा केला आहे. परंतु सामान्य जनतेला जिल्हा अधिकारीवर पूर्ण विश्वास नसल्याने सामान्य जनता अस्वस्थ झाली आहे. कारण प्रधानमंत्री यांनी दावा केला की आपल्या देशाला तेलाची कोणतीही कमी होणार नाही. व दोनच दिवसांनी संसदेच्या भाषणात घोषणा केली की कोरोना सारखी परिस्थिती येण्याची शक्यता आहे सामान्य जनतेने तयारी करावी. त्यामुळे सामान्य जनता यांना जिल्हाधिकारी यांनी केलेल्या वक्तव्यावर विश्वास होणे अशक्य झाले आहे.

सामान्य जनता त्यांना लागणारे घरगुती सिलेंडराची सोय स्वतः करत आहे. सर्व गॅस सिलिंडरचा एजन्सीत सिलिंडर साठी रांगा लागल्या आहेत. तसेच नोंदणी म्हणजेच बुकिंग केल्यास २ दिवसात सिलेंडर घरी पोहोच होत होता परंतु आता नोंदणी केल्यास दहा ते बारा दिवसाचा कालावधी लागेल सांगण्यात येत आहे. आणि २५ दिवस उलटूनही सिलिंडर पोहोच होत नाही कारण विचारल्यास अजून १०-१५ दिवस लागतील असे उत्तर देण्यात येतात. या उलट काळाबाजार करणाऱ्या व्यक्ती तीनपट रकमेत सिलेंडर विकत आहे आणि मजबूर झालेली सामान्य जनता नाविलाज तीनपट रक्कम देऊन संसार चालवण्यासाठी विकत घेत आहे. आता प्रश्न असा आहे की एकीकडे जिल्हाधिकारी मुबलक साठा असल्याचा दावा करत आहे आणि दुसरीकडे सामान्य जनतेच्या गॅस साठी रंगाच्या रांगा लागल्या आहे. तिसरीकडे तीनपटीने काळाबाजार होत आहे. काळाबाजार होत असताना जिल्हाधिकारी कुठे आहेत? या काळाबाजार करणाऱ्या लोकांवर कारवाई का होत नाही असा प्रश्न एम आय एम जिल्हाध्यक्ष डॉ. परवेज अशरफी यांनी निवेदनाद्वारे उपस्थित केले आहे.

निवेदनात पुढे असे नमूद आहे की या सर्वांपासून सामान्य जनतेला दिलासा तेव्हाच मिळेल जेव्हा सर्व सुरळीत होईल. त्यासाठी जिल्हाधिकारी यांना काळाबाजार रोखणे गरजेचे आहे. काळाबाजार करण्यासाठी शासन प्रशासनातील कर्मचारी अधिकारी सामील असण्याची शक्यता नाकारता येत नाही. असा आरोपही करण्यात आले आहे. सखोल चौकशी करून आणि काळाबाजार करणाऱ्या व्यक्तींवर आणि त्यांना मदत करणाऱ्या शासन प्रशासनमधील अधिकारी कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

# 'नरेंदर कब मिलेगा सिलेंडर' च्या घोषणा देत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'पेटवली चूल'

नगर – राज्यभर सुरू असलेल्या गॅस टंचाईमुळे सर्वसामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन पूर्णतः विस्कळीत झाले असून, याविरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने 'नरेंदर कब मिलेगा सिलेंडर' या घोषणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर चूळ पेटून आंदोलनाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. जिल्हाध्यक्ष योगेश साठे, शहराध्यक्ष हनीफ शेख यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. या वेळी जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि प्रांताधिकारी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गॅस टंचाईमुळे स्वयंपाकघरातील गॅस शेगड्या थंड पडल्या असून चहाच्या टपऱ्या, फूड स्टॉल्स आणि लहान व्यावसायिकांचे व्यवसाय ठप्प झाले आहेत. अनेकांना कोळसा आणि लाकडाच्या चुलीवर स्वयंपाक करावा लागत आहे.



दरम्यान, अकोला येथे गॅस सिलेंडरसाठी रांगेत उभे असताना माजी सरपंच शंकरराव शिरसाठ यांचा मृत्यू झाला, तर अमरावतीमध्येही अशाच प्रकारे एका तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनांमुळे परिस्थितीची गंभीरता अधोरेखित होत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. गॅस टंचाईचा फटका केवळ घरगुती वापरापुरता मर्यादित नसून, हॉटेल्स, केटरिंग व्यवसाय, रिक्षा चालक तसेच विद्यार्थ्यांच्या मेस सेवांवरही मोठा परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी गॅसच्या अभावामुळे लग्न समारंभ आणि धार्मिक कार्यक्रम पुढे ढकलण्यात आले आहेत. रिक्षा चालकांनीही मोर्चे काढून आपला आक्रोश व्यक्त केला आहे. याशिवाय, अनेक ठिकाणी गॅस सिलेंडरचा काळाबाजार होत असून, काही ठिकाणी ५ ते ७ हजार रुपयांपर्यंत दर आकारला जात असल्याचा आरोप करण्यात आला. काही ठिकाणी सिलेंडरमध्ये पाणी भरून देण्यासारखे प्रकारही समोर आल्याचे निवेदनात नमूद आहे. गॅस सिलेंडरची कृत्रिम टंचाई तात्काळ थांबवावी, काळाबाजार रोखून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, २५ दिवसांनंतर गॅस मिळण्याची अट शिथिल करावी, विद्यार्थ्यांसाठी कम्युनिटी किचन सुरू करावे, प्रत्येक २ किमी अंतरावर गरजूंसाठी अन्न व्यवस्था करावी, गॅस पुरवठा कधी सुरळीत होणार याबाबत स्पष्ट माहिती द्यावी, केवायसी नसल्यामुळे गॅस नाकारण्याचे प्रकार थांबवावेत, उज्वला योजनेअंतर्गत वितरणाचे जिल्हानिहाय ऑडिट करावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी शहराध्यक्ष हनीफ शेख, शहर महासचिव प्रवीण ओरे, भिंगार शहराध्यक्ष राजीव भिंगारदिवे, नगर तालुकाध्यक्ष रविकिरण जाधव, जिल्हा महासचिव प्रसाद भिवसने, जिल्हा उपाध्यक्ष योगेश क्षीरसागर, जिल्हा संघटक सुधीर ठोंबे, अमर निरभावाने, संकेत शिंदे, प्रज्योत शिर्के, देविदास भालेराव, संतोष पवार, सुनील सकट, सुरेश पानपाटील आदी उपस्थित होते.

## स्ट्रिट लाईट ट्यूबलर पोल कोसळला



सावेडी उपनगरातील पाईपलाईन मुख्य रस्त्यावरील मनपाचा दुभाजकात एलईडी पथदिवा ट्यूबलर पोल (स्ट्रिट लाइट) कोसळला आहे. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झालेली नाही. संपूर्ण पाईपलाईन रस्त्यावर मनपाच्या ट्यूबलर पोलवर अनधिकृत ओव्हरहेड टीव्ही व इंटरनेट केबल जाळ्यांनी अतिक्रमण केलेले असून त्या ताणामुळे ही विद्युत पोल कोसळला असावा तसेच अनेक पोल खालून अगोदरच गंजलेले आहेत तसेच सदर पोलवर अनधिकृत बेकायदा फ्लेक्स व जाहिरात बाजी झालेली आहे. परिसराचे विद्रुपीकरणा ही होत आहे. सदर केबल अनेकदा रस्त्यावर पडल्यानंतर त्यामध्ये गुतून अनेक अपघात ही झालेले आहेत तसेच ह्यावर मनपा चे कोणतेही नियंत्रण नसल्याने एखाद्या दिवशी मोठा अपघात होऊ शकतो तरी मनपा प्रशासनानी यावर गांभीर्याने विचार करावा अशी मागणी येथील नागरिक करत आहे. (छाया : महावीर पोखरणा)

# गृहिणी

## आरोग्य

### श्रीखंड खाण्याची योग्य वेळ कोणती

श्रीखंड हा अनेकांचा आवडीचा पदार्थ आहे, पण आयुर्वेदानुसार आणि आहारशास्त्राच्या दृष्टीने तो खाण्याची एक ठराविक वेळ आणि पद्धत आहे. श्रीखंड मुळात दही, साखर आणि ड्रायफ्रूट्सपासून बनलेले असल्याने ते पचायला जड आणि 'कफ' वाढवणारे असते. श्रीखंड खाण्याबाबतचे काही महत्त्वाचे नियम खालीलप्रमाणे आहेत. श्रीखंड खाण्यासाठी दुपारची वेळ सर्वात उत्तम मानली जाते. दुपारी आपली पचनशक्ती (जठराग्नी) प्रबळ असते, त्यामुळे जड पदार्थ सहज पचतात. उन्हाळ्यात श्रीखंड खाणे फायदेशीर ठरते कारण ते शरीराला थंडावा देते. चुकीच्या वेळी श्रीखंड खाल्ल्याने आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतात. रात्री श्रीखंड कधीही खाऊ नये. रात्री शरीराचा मेटाबॉलिज्म मंद असतो आणि श्रीखंडामुळे शरीरात 'कफ' वाढतो. यामुळे श्वसनाचे विकार होऊ शकतात. या ऋतूंमध्ये वातावरणात आधीच ओलावा किंवा थंडी असते. अशा वेळी श्रीखंड खाल्ल्याने सर्दी-खोकल्याचा त्रास वाढू शकतो. सकाळी उठल्याबरोबर रिकाम्या पोटी श्रीखंड खाणे टाळावे.

## पाककला

### कुरकुरीत भेळ

**साहित्य** - मुरमुरे (भडंग)-३-४ वाट्या (कुरकुरीत केलेले), बारीक शेव, पापडी-अर्धी वाटी, कांदा व टोमॅटो-प्रत्येकी १ मध्यम (बारीक चिरलेला), बटाटा-१ उकडलेला (फोडी करून), ओली चिंच-गुळाची चटणी-२-३ मोठे चमचे, तिखट हिरवी चटणी-१-२ मोठे चमचे, मसाले-चाट मसाला, लाल तिखट, मीठ, सजावटीसाठी-कोथिंबीर, लिंबू आणि खारे दाणे

**कृती** - सर्वात आधी मुरमुरे कढईत थोडे गरम करून घ्या. त्यात चिमूटभर हळद आणि मीठ घातले तर चव अधिक खुलते. एका मोठ्या बाऊलमध्ये बारीक चिरलेला कांदा, टोमॅटो आणि उकडलेला बटाटा घ्या. त्यात हिरवी तिखट चटणी आणि चिंच-गुळाची गोड चटणी घालून व्यवस्थित मिक्स करा. आता या मिश्रणात कुरकुरीत मुरमुरे, खारे दाणे आणि पापडी चुरडून टाका. वरून चाट मसाला आणि थोडे लाल तिखट भुरभुरा. सगळ्यात शेवटी भरपूर कोथिंबीर आणि बारीक शेव घाला. खाण्यापूर्वी अर्ध्या लिंबाचा रस पिळा आणि झटपट मिक्स करून लगेच सर्व्ह करा.

## वास्तू

### तर येईल दारिद्र्य

अनेकदा आपल्या अशा काही सवयी असतात. ज्या आपल्यासाठी सामान्य असतात. पण, वास्तूशास्त्रानुसार, यामुळे घरात दारिद्र्यसुद्धा येऊ शकतं. या गोष्टी कोणत्या ते जाणून घेऊयात.

✻ मंगळवार किंवा शनिवारी मीठ खरेदी करु नये. कारण या दिवशी खरेदी केलेले मीठ आपल्या घरात कर्जबाजारीपणा आणते.

✻ घराच्या पूर्व किंवा उत्तर दिशेला कधीच आरसा लावू नका. चुकीच्या ठिकाणी आरसा लावल्यामुळे घरात वास्तूदोष निर्माण होतो.

## सौंदर्य

उन्हाळा आला की आंब्याचा सीझन चालू होतो. आपण आंब्याचे सेवन करतो. त्याच बरोबर आपण त्याच्या फेस पॅक बनवू शकतो. आंब्याचा रस काढून त्यामध्ये थोडेसे कोल्ड क्रीम व थोडेसे थंड दूध मिक्स करून त्याचे पेस्ट बनवून आपल्या चेहऱ्यावर लावून १५ मिनिट तसेच ठेवावे मग साध्या पाण्यानी चेहरा स्वच्छ धुवावा.

## सल्ला

पोहे भिजवताना नेहमी चाळणीमध्ये भिजवावे यामुळे जास्तीच पाणी सहजच निघून जाते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

बुधवार, दि. ८ एप्रिल २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, मूळ अहोरात्र, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल.

**वृषभ** : आज रात्री विश्रांती घ्या. घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. शत्रू प्रभावहीन ठरतील.

**मिथुन** : आजचा दिवस आपल्यासाठी नवीन सुरुवात करणे किंवा व्यक्तीमत्वाचे ध्येय निर्धारित करण्यात सहायक ठरेल.

**कर्क** : आपल्या जीवनातील इच्छित वस्तूवर लक्ष द्या. कौटुंबिक प्रकरणांमध्ये कोणत्याही प्रकारचे विवाद टाळा.

**सिंह** : नोकरदार व्यक्तींनी कार्यात सहयोग घेऊन चालावे. कौटुंबिक प्रश्नांचे निराकरण होईल.

**कन्या** : प्रसिद्धी मिळेल. अडकलेली कार्ये योग्य वेळी होतील. नोकरदार व व्यापारी बंधूंना लाभ मिळेल.

**तूळ** : चांगले काही घडण्यासाठी आपणास आपल्या कामात एकाग्रता वाढवण्याची आवश्यकता आहे.

**वृश्चिक** : आरोग्य उत्तम राहील व एखाद्या जुन्या मित्राशी भेट होण्याची शक्यता आहे.

**धनु** : एखाद्या जीवलगाबरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न करा.

**मकर** : वाहने व उपकरणे जपून चालवा नाहीतर नुकसान होण्याची संभावना आहे. आनंदाची बातमी मिळेल.

**कुंभ** : व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील. चांगले भोजन मिळेल.

**मीन** : एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल. मानसिक स्थिती आनंददायक राहील.

## शब्दगंध क्र. ७४०४ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ■ | ३ | ४ | | ५ | ६ |
| ■ | ७ | ८ | | | ■ | ९ | |
| १० | | | ■ | ११ | | | |
| १२ | | ■ | १३ | | ■ | | ■ |
| १४ | | | | ■ | १५ | | १६ |
| ■ | | ■ | १७ | | ■ | १८ | |
| १९ | | २० | | ■ | २१ | | |
| | ■ | | ■ | २२ | | ■ | |

**आडवे शब्द :-** १) एक कडधान्य ३) रागावलेला; कोपलेला ७) एक शास्त्र; केमिस्ट्री ९) वस्तू; पर्वत; डाग १०) सावध; दक्ष; हुशार ११) गळ्यात घालावयाचा एक दागिना १२) महिना; माह १३) टरफलासहित तांदूळ १४) जलाशय; तळे; तलाव १५) एक फूल; पंकज; नीरज; कमळ १७) इमारत; बिल्डिंग; भवन १८) मारल्याची खूण; लांबट उठाणू १९) सद्य स्थितीतील; वर्तमान काळातील २१) उष्ण; तप्त २२) औषधाचा द्रवरूप सत्त्वांश

**उभे शब्द :-** २) 'आपले काम होईपर्यंत एखाद्याची मदत घ्यायची व झाल्यावर त्याला विचारायचे सुद्धा 'नाही' या अर्थाची एक म्हण - +++ ++ ++ मरो ३) आंब्याचे बी; बाठा ४) शिशीर ऋतूतील झाडाच्या पानांचे गळणे ५) हिंदूंचे तीर्थ असलेला हिमालयातील एक जलाशय ६) मोठे गाव; शहर ८) एक मूल्यवान लाकूड व त्याचे झाड १०) दोन किंवा अनेक शब्दांचा मिळून बनलेला एक शब्द १३) उंट हकणारा १६) कोळिष्टक १९) 'इंशुरन्स'चे मराठी रूप २०) हिंदू वर्षाचा अकरावा महिना २१) मग्न; लीन; रममाण; रत; गुंग

### शब्दगंध क्र. ७४०३ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| म | द | र | ते | रे | सा | ■ | फ |
| हा | र | ■ | ल | वा | द | ■ | ट |
| रा | व | ■ | ■ | ■ | ■ | का | का |
| ज | ळ | ज | ळ | ■ | गा | ज | ■ |
| ■ | ■ | पा | ■ | मा | र | वा | ड |
| स | मा | न | शी | ल | ■ | ■ | बा |
| वा | ल | ■ | ■ | कं | ठ | ■ | ■ |
| ल | क | वा | ■ | स | क | ला | द |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : नशीब हे लिफ्टसारखे तर कष्ट हे पायऱ्यांसारखे असतात लिफ्ट कधीही बंद पडू शकते पण पायऱ्या मात्र तुम्हाला नक्कीच उंचीवर नेतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### टिटॅनियम मेटलचे हार्ट जीवनदान देवू शकते का?

ऑस्ट्रेलियाच्या न्यू साऊथ वेल्स राज्यातला चाळीशीचा एका तरुणाचे हृदय काम करेनासे झाले. डॉक्टरांच्या तपासणीनंतर त्याच्यासाठी हृदयारोपण हा एकच पर्याय शिल्लक होता. हृदयारोपण करण्यासाठी डॉक्टरांची फौज तयारच होती पण हृदयदाता मिळेपर्यंत थांबणे भाग होते. असा दाता मिळेपर्यंत काय असा प्रश्न समोर उभा होता. डॉक्टरांनी शेवटचा उपाय म्हणून तात्पुरते काही दिवस टिटॅनियम मेटलचे कृत्रिम हृदय बसवण्याचा निर्णय घेतला. रुग्णही हा उपाय करायला तयार झाला. टिटॅनियम मेटलचे हे हृदय म्हणजे एक यंत्रच आहे जे हृदयाचे काम करते. रुग्णावर त्वरीत शस्त्रक्रिया करून हे मेटलचे हार्ट बसवण्यात आले. रुग्ण पण इतका जिद्दी की त्याने १०० दिवस या हृदयाच्या आधारावर काढले. हा पण एक विक्रमच होता.

आतापर्यंत इतके दिवस पूर्णपणे यांत्रिक हृदयावर तग धरणारा हा पहिलाच रुग्ण होता. त्यानंतर काहीच दिवसात त्याला हृदयदाता मिळाला आणि ती शस्त्रक्रिया पण यशस्वी झाली. या अनुभवानंतर डॉक्टरांना आशा वाटते आहे की येत्या काळात असे यांत्रिक हृदयच कायम काम करेल आणि हृदयदात्याची गरजच भासणार नाही. ही झाली त्या रुग्णाची कथा पण हे असे अत्याधुनिक हृदय बनवणाऱ्या शास्त्रज्ञाबद्दल चार शब्द सांगायलाच हवेत. टिटॅनियम मेटलचे हार्ट बनवणाऱ्या या शास्त्रज्ञाचे नाव आहे डॉ. डॅनियल टीम्स ! त्याने बनवलेल्या या यांत्रिक हृदयाचे नाव आहे BiVCOR. डॅनियलच्या वडीलांचे हृदय अचानक बंद पडले आणि त्यांना मृत्यू आला. या घटनेने दु:खी झालेल्या डॉ. डॅनियल टीम्सने कृत्रिम हृदय या विषयावर संशोधन सुरु केले.

नोकरी सोडून दिली आणि सातत्याने असे हृदय बनवण्याच्या मागे तो लागला. त्याच्या प्रयत्नाचे फळ म्हणजे BiVCOR - टिटॅनियम आवरणात मॅग्नेट आणि एक फिरता रोटर यांच्या साह्याने रक्ताभिसरण करणारे कृत्रिम हृदय !! आता गेली २० वर्षे या विषयावरच काम करणाऱ्या कंपनीचा चीफ टेक्नॉलॉजी ऑफिसर म्हणून डॉ. डॅनियल टीम्स कार्यरत आहेत. हे प्रयत्न यशस्वी झाले तर ती अनेक रुग्णांच्या एका नव्या आयुष्याची सुरुवात असेल.

### नकारात्मक विचार

एकदा, एक माणूस एका हत्तीला दोरीने बांधून नेत होता. दुसरा एक माणूस हे पाहत होता. एवढ्या मोठ्या प्राण्याला इतक्या हलक्या दोरीने बांधलेले पाहून त्याला आश्चर्य वाटले.

त्या दुसऱ्या माणसाने हत्तीच्या मालकाला विचारले, एवढ्या मोठ्या प्राण्याला हलकी दोरी तोडता येत नाही आणि तो अजूनही तुमच्या मागे कसा येत आहे? हत्तीच्या मालकाने समजावून सांगितले की, जेव्हा हत्ती लहान होता, तेव्हा त्याला दोरीने बांधले होते. त्यावेळी त्याने दोरी तोडण्याचा प्रयत्न केला, पण त्याला ते जमले नाही.

वारंवार प्रयत्न करूनही तो दोरी तोडू शकला नाही. त्यामुळे हत्तीला वाटते की, तो हा दोरी तोडू शकत नाहीत, आणि मोठे झाल्यावर ते प्रयत्न करणे सोडून देतो.

तात्पर्य : आपणही अनेक नकारात्मक विचारांना आपल्या मनात रुजू देतो, जे आपण करू शकत नाही आणि आपण स्वतःला अशा एका दोरीने बांधून घेतो, जी प्रत्यक्षात अस्तित्वातच नसते.

## जीवन का अमृत (भाग १)



आध्यात्मिक रूप से जागृत इंसान अपने दूसरे कम भाग्यशाली भाई-बहनों के बर्ताव से दुखी महसूस करते हैं, जो कि दयालु सत्गुरु द्वारा दिए गए महान आध्यात्मिक आनंद को समझ नहीं सकते।

इस कारण से, जो पवित्र रास्ते पर नहीं हैं, वे सही प्रकार से बर्ताव नहीं कर सकते। दूसरों की कमियों को बताने के बहुत से तरीके होते हैं। आप ऐसा नम्रता से ही करें और तब आपके शब्द उनके हृदयों तक पहुँचेंगे और फल लाएँगे ।

१४. सदाचारी जीवन रूहानियत को पाने की सीढ़ी है। सच्चाई सर्वोपरि है, पर सच्चा जीवन सच्चाई से भी ऊपर है ।

आध्यात्मिक उन्नति के लिए, मन और बुद्धि का स्थिर होना बहुत जरूरी है। बेकार की दिमागी कसरत करना या मनमानी करना, रूहानी तरक्की में बाधा डालते हैं। एकाग्रता का मतलब है, मन में उठने वाली तरंगों या विचारों को शांत करना और इसे पाया जा सकता है, अंतर में शब्द धारा से जुड़कर, जो कि आपके साथ सदा मौजूद गुरु-सत्ता की सूक्ष्म अभिव्यक्ति है ।

### रुहानी तरक्की

१५. मैंने गोल्फ और ताश में आपकी रुचि को नोट किया। दूसरा खेल नुकसानदेह है और आपने इसे छोड़कर सही किया है।

कृपया अपने निश्चय पर दृढ़ रहो और बीते हुए समय को पूरी तरह भूल जाओ। पुरानी घटनाओं में ही खोए न रहो, न ही पुराने आनंदों को याद करने की कोशिश करो, क्योंकि इस प्रकार से मन को बहुत खुराक मिलती है। जब भी आपका मन इसके लिए बेचैन हो तो आप सच्चे दिल से पवित्र सिद्ध नामों का सिमरन करें और भक्ति के साथ प्रार्थना करें। जहाँ तक शारीरिक ताज़गी मिलने का प्रश्न है, तो गोल्फ एक अच्छा खेल है यह एक शारीरिक कसरत है और अगर आप इसका खर्चा वहन कर सकें, तो इसको जारी रखने में कोई आपत्ति नहीं है। आप जानते हैं कि जुए जैसी चीजें नुकसानदायक हैं। आप मानेंगे कि मन पहले से ही विचलित करने वाले ख्यालों से भरा पड़ा है, अतः इसी प्रकार के विचलित करने वाले ख्यालों से इसे और भरने का सीधा अर्थ होगा, आग में ईंधन डालना ।

१६. आपने संगीत के बारे में पूछा है। जरूरी नहीं कि संगीत भजन सिमरन के लिए बुरा हो, क्योंकि प्रार्थना के गीत कभी-कभी हमारी आंतरिक आध्यात्मिक चाहत को जगाने में सहायक होते हैं। लेकिन बाहरी संगीत मन को खुराक देता है, जबकि पवित्र शब्द धुन को सुनने से आत्मा को खुराक मिलती है, जिससे यह ताकत पाकर परलोक के मंडलों में नियमित रूप से उड़ने लायक हो जाती है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

शिवानीदीदी :

कोणीतरी मला आर्थिकदृष्ट्या, शारीरिक त्रास देऊन किंवा त्यांच्या नकारात्मक संस्काराप्रमाणे संवाद साधून अस्वस्थ करू शकतं. त्यांच्या अशा वागण्यामुळे माझ्या मनात जे येतं ती माझी निर्मिती असते. माझ्या मनात मला एकच व्यक्ती अस्वस्थ करू शकते ती म्हणजे मी. फक्त मी. ज्या क्षणी आपण एखाद्याकडे बोट दाखवतो त्याच क्षणी आपण त्यांना शक्ती देऊन आपल्या ऊर्जेचा ह्रस करून घेतो.

सुरेश ओबेरॉय :

म्हणून आपण इतरांना दोष देऊ नये.

शिवानीदीदी :

आपल्याकडे पर्याय उपलब्ध आहे : इतरांना दोष देणं किंवा स्वतः वैयक्तिक जबाबदारी स्वीकारणं. पहिल्या पर्यायात 'ते' जबाबदार असतात तर दुसऱ्या पर्यायात 'आपण'. जर आपण चिडलो तर आपली शक्ती कमी होते. शिवाय, यासाठी इतरांना दोषी ठरवलं तर आपल्याला चिडण्याची सवय लागते.

सुरेश ओबेरॉय :

इतरांना दोषी ठरवणं हा एक अंतहीन खेळ आहे.

शिवानीदीदी :

हो, आणि याचा अर्थ आपली बॅटरी कमी होत जाईल. आपल्या भावनांसाठी परिस्थितीला, आपल्या भूतकाळाला, नशिबाला, देवाला किंवा जगाला दोष देणं आपल्याला कमकुवत बनवतं. हो, परिस्थिती आपल्याला अनुकूल नसेलही पण तरीही आपल्या मानसिक स्थितीची जबाबदारी आपलीच आहे. आपल्याला राग येऊ शकतो, आपण दुखावले जाऊ शकतो हे ठीक आहे. पण आपल्या भावनांची जबाबदारी आपणच घेण्याची गरज आहे. जेणेकरून इतरांना दोष दिल्याने किंवा सतत त्याच त्या गोष्टींचा विचार केल्याने आपली शक्ती कमी होणार नाही.

सुरेश ओबेरॉय :

पूर्वी, माझ्याशी वाईट वागणाऱ्या व्यक्तीला स्वीकारणं मला अवघड जायचं. पण आता स्वीकृती सुंदर आहे हे मला समजलंय.

शिवानीदीदी :

स्वतःत बदल घडवून आणण्यासाठी स्वीकृतीचीच गरज आहे. जर आपण चिडलो आणि इतरांना दोष दिला तर त्यांनी त्यांच्यात बदल करावेत अशी आपली अपेक्षा असेल. कारण आपल्याला होणाऱ्या त्रासासाठी आपण त्यांना जबाबदार समजत राहू. पण जेव्हा राग येणं किंवा चिडणं ही आपलीच निर्मिती आहे हे जेव्हा आपल्याला समजतं तेव्हा आपलं संपूर्ण लक्ष स्वतःवर, आतमध्ये जातं. अशा प्रकारे आपल्याला आपले संस्कार बदलणं सोपं जातं. आता जोवर आपण चिडलेले किंवा दुखावलेले असू तितक्याच काळापुरती आपली शक्ती कमी होते. अशा वेळी कोणावरही दोषारोपण होत नसल्यामुळे इतर कोणी माफी मागण्याची

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको - तुम्हाला कधी पासुन ही वाईट सवय लागली? नवरा - कोणती...
बायको - खबरदार! खोटे बोलू नका, मी आताच
तुमच्या खिशातून गुलाबी रंगाच तिकीट फाडून फेकली
नवरा - मूर्ख, ती २००० ची नोट होती.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ भारताने २०२५-२६ साठी किती टक्के जीडीपी वाढीचे लक्ष ठेवले आहे?
- ७.५ टक्के

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### सफरचंद

२) सफरचंद नियमित खाल्ल्याने दातांवरचे किटण जाऊन दात स्वच्छ होतात.

३) सफरचंद चांगले बारीक चावून खाल्ल्याने तोंडातील व दातांमधील जंतूना आळा बसतो व त्यामध्ये असणाऱ्या क जीवनसत्त्वामुळे दातांबरोबरच हिरड्यांचेही आरोग्य चांगले राहते. सफरचंदाच्या सेवनाने हिरड्या मजबूत होतात. तसेच तोंड स्वच्छ करण्याचा गुणधर्म सफरचंदामधील अन्नघटकांमध्ये असतो. म्हणून दातांच्या तक्रारींवर सफरचंदाचा वापर नियमित करावा.

४) लहान बालकांची शारीरिक व मानसिक वाढ उत्तम होण्यासाठी रोज एक सफरचंद खावे. ज्ञानतंतूंच्या आणि मेंदूच्या वाढीसाठी सफरचंद उत्तम फळ आहे.

५) सफरचंदातील आम्लतेमुळे सांधेदुखी, गुडघेदुखी हे विकार कमी होतात.

६) सफरचंदामध्ये पोटॅशिअम आणि फॉस्फरस हे क्षार विपुल प्रमाणात असतात. अन्नातून पोटॅशिअम पुरेशा प्रमाणात ज्यांना मिळते, त्या व्यक्तींना हृदयविकार होत नाही.

सफरचंदाच्या सेवनाने विपुल प्रमाणात पोटॅशिअम मिळत असल्यामुळे तसेच त्यामध्ये असणारे क जीवनसत्त्व व पेक्टीनमुळे रक्तवाहिन्यांमधील चरबी कमी होऊन रसरक्तपुरवठा सुरळीत होतो व पर्यायाने हृदयविकाराचा धोका कमी करता येतो. मध व सफरचंदाचे एकत्र सेवन करावे.

७) सफरचंदातील पेक्टीन व क जीवनसत्त्वामुळे शरीरातील विषारी द्रव्ये नाहीशी होतात व त्यामुळे उच्च रक्तदाबही कमी होतो.

८) कोरड्या खोकल्याची ढास लागत असल्यास काही दिवस रोज गोड सफरचंदाचा गर व मध यांचे मिश्रण खावे.

९) सफरचंद नियमित खाल्ल्याने मूतखडा विरघळून लघवीवाटे बाहेर पडतो.

१०) सफरचंदाची साल किंचित उकडून चेहऱ्यावर चोळल्याने सुरकुत्या कमी होऊन त्वचेची कांती वाढते.

११) अतिसार, प्रवाहिका, आमांश या आजारांत सफरचंद खाल्ल्यास त्यामध्ये असणाऱ्या गॅलॅक्टरॉनिक ॲसिड व मॅलिक ॲसिडमुळे पचनसंस्थेचे कार्य सुरळीत चालते. तसेच नैसर्गिक पेक्टीनमुळे आतड्याच्या आतून संरक्षक थर तयार होतो. याकरिता या आजारांमध्ये सफरचंदाचा गर त्यात जिरे, दालचिनीपूड व मध मिसळून घ्यावा.

१२) डोकेदुखी जर तीव्र स्वरूपाची असेल, तर आठवडाभर रोज सकाळी एक सफरचंद खावे. याने डोकेदुखी थांबते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांड्ळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००



नवीपेठ जैनस्थानक येथे कु.मानसी शेखर भंडारी व कुमारी नमिता सचिन भंडारी यांनी वैद्यकीय क्षेत्रातील दंतरोग तज्ञ पदवी संपादन केल्याबद्दल आनंद चालीसा गुरुकृपा मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

# शिक्षणासोबतच धार्मिक संस्कार देणे गरजेचे आहे

## किशोर मुनोत यांचे प्रतिपादन, वैद्यकीय क्षेत्रातील दंतरोग तज्ञ पदवी संपादन केल्याबद्दल कु.मानसी व नमिता भंडारी या भगिनींचा सत्कार

नगर – कु.मानसी भंडारी व कु.नमिता भंडारी या भगिनींनी अथक परिश्रम घेऊन वैद्यकीय क्षेत्रातील पदवी संपादन केली आहे. या भगिनींचे यशामुळे भंडारी परिवार व समाजाच्या नावलौकिकात भर पडली आहे. भंडारी परिवार हा पूर्वीपासूनच धार्मिक आहे. भंडारी परिवाराने केलेल्या धार्मिक संस्कारामुळेच कु.मानसी व कु.नमिता यांनी उत्तम यश संपादन केले आहे. यापुढील काळात या भगिनींनी समाजासाठी योगदान द्यावे. समाजातील अनेक मुले उच्चशिक्षित होत आहेत. ही समाजासाठी अभिमानास्पद बाब आहे. शिक्षणासोबतच धार्मिक संस्कार देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन पांजरपोळ गोरक्षण संस्थेचे सेक्रेटरी किशोर मुनोत यांनी केले आहे.

नवीपेठ जैनस्थानक येथे कु.मानसी शेखर भंडारी व कुमारी नमिता सचिन भंडारी यांनी वैद्यकीय क्षेत्रातील दंतरोग तज्ञ पदवी संपादन केल्याबद्दल आनंद चालीसा गुरुकृपा मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पांजरपोळ गोरक्षण संस्थेचे सेक्रेटरी किशोर मुनोत, उद्योजक सुरेश मुनोत, जैन कॉन्फरन्सचे पदाधिकारी अशोक (बाबुशेठ) बोरा, श्रावक संघाचे सेक्रेटरी नितीन कटारिया, विनायकनगर संघपती राजु भंडारी, विहार ग्रुपचे यश शाह, जय आनंद महावीर युवक मंडळाचे उपाध्यक्ष कुंतीलाल राका, उद्योजक रमेश गुंदेचा, विजय गुंदेचा, पारस गुंदेचा, पारस लोढा, सुभाष भंडारी, रमनलाल भंडारी, ईश्वर नहार, भरत बागरेचा, अनिल पितळे, चिराग गांधी, महेश मुनोत, सौ.शिल्पा मुनोत, सौ.वंदना छाजेड, सौ.रिमल गुंदेचा, सौ.अलका गुंदेचा, स्वाती बोरा, सुनिता बोरा, जितेन्द्र बोरा आदी उपस्थित होते.

अशोक (बाबुशेठ) बोरा म्हणाले, कु. मानसी व कु.नमिता भंडारी यांनी मोठ्या परिश्रमाने व जिद्दीने वैद्यकीय क्षेत्रातील पदवी मिळवली आहे.ही कौतुकास्पद बाब आहे.भंडारी भगिनींनी मिळविलेल्या उत्कृष्ट यशामुळे त्यांचे माता–पिता,गुरुजन व समाजाच्या नवलौकिकात भर पडली आहे.समाजातील उच्च शिक्षण करू इच्छिणाऱ्या मुलांना प्रेरणा देणारे असे शिक्षण कु.मानसी व कु.नमिता भंडारी यांनी केले आहे. निश्चितच समाजासाठी ते मोठे योगदान देतील. अहिल्यानगर शहरात दंतरोग तज्ञ म्हणून भंडारी भगिनींनी उज्वलाचे कार्य करावे. अशी भावना त्यांनी व्यक्त केली आहे.

सुभाष भंडारी म्हणाले, आळंदी येथील वेदांताचार्य हभप डॉ.नारायण महाराज जाधव यांच्या प्रेरणेने व आशीर्वादाने कु.मानसी व कु.नमिता भंडारी यांनी उत्तम यश मिळविले आहे. कु.नमिता भंडारी यांचे वडील डॉ.सचिन भंडारी यांनी देखील मार्गदर्शन केले आहे. तसेच भंडारी परिवारास महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा.यांचा आशीर्वाद लाभला आहे.

यावेळी पारस लोढा यांनी सूत्रसंचालन केले. रमनलाल भंडारी यांनी आभार मानले.

साप्ताहिक आनंद चालीसा कार्यक्रमातील भाग्यशाली भाविकांना प्रभावना भेट देण्यात आली. या कार्यक्रमासाठी जैन समाज बांधव व भगिनी उपस्थित होते.

# प्रेरणादायी अक्षरधन

## सुधारकांचा महाराष्ट्र

“मुसाफिर” वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी
डॉ.रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

महाराष्ट्राला संतपरंपरा लाभली. लोकपरंपरा लाभली तशीच सुधारकांचीही परंपरा लाभली. बाळशास्त्री जांभेकरांपासून सुरु झालेली सुधारकांची मालिका तर्कनिष्ठ, बुद्धिवादी विचारांचा प्रवाह पुढे पुढे नेत होती. लोकहितवादी, म. फुले, न्या. रानडे, रा. गो. भांडारकर, स्वा. सावरकर, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. आंबेडकर यांच्याबरोबर बुद्धिवादी विचारवंत म्हणून गोपाळ गणेश आगरकरांचे नावही त्या काळात अग्रक्रमाने घ्यावे लागेल.

आचार्य अत्रेंनी म्हटले आहे की 'महाराष्ट्र ही महान व्यक्तिंची जन्मभूमी व अभंग उक्तिची स्फूर्तिभूमी आहे. महाराष्ट्र ही अमर पराक्रमाची रणभूमी आहे. अलौकिक त्यागाची आणि सेवेची यज्ञभूमी आहे.'

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात या भूमीच्या सुपुत्रांनी वेळोवेळी बंडाचे निशाण उभारून बुद्धिप्रामाण्यवाद मांडला. महाराष्ट्राची बंडखोरांची परंपरा आगरकरांनी वैचारिक क्षेत्रापर्यंत आणून 'लोकहितवादींची शतपत्रे' म्हणजे बुद्धिवादी विचारातून घडलेले एक वैचारिक प्रबोधनपर्व म्हणावे लागेल. मुंबईत भाऊ महाजन यांनी सुरु केलेल्या 'प्रभाकर' या साप्ताहिकात १८४८ पासून देशबांधवांना उद्देशून शंभर पत्रे लिहिली. त्यात त्यांनी समाजाच्या धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक अशा ज्या अनेक अंगांचे मूलभूत परीक्षण केले. संपत्तीनिरपेक्ष आणि जातीनिरपेक्ष बंधुभाव व समानता यांनी ओथंबलेली राष्ट्रवादाची कल्पना त्यांनी मांडली आणि बालविवाहास प्रतिबंध, विधवा विवाह, स्त्रीशिक्षण, जातीनिर्बंधास विरोध. पुनर्विवाह, व्यक्तिस्वातंत्र्य या सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला. ज्या काळात मार्क्सचा सिद्धांत रुजला नव्हता त्या काळात लोकहितवादींनी गरिबांची, श्रमजीविकांची, दलितांची बाजू घेऊन त्यांच्या प्रतिष्ठेला मोठेपणा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. सन १८९६ मध्ये भरलेल्या सामाजिक परिषदेमध्ये न्या. रानडे यांनी म्हटले आहे की 'मानवाला पूर्णत्व प्राप्त करून देणे हेच सुधारणेचे प्रयोजन आहे.' जन्मनिष्ठेपेक्षा गुणनिष्ठेची जोपासना केली पाहिजे, अंधदैववादाऐवजी मानवाची प्रतिष्ठा वाढायला हवी. सामाजिकीकरणाचे तत्त्वज्ञान सांगणाऱ्या न्या. रानडे यांनी व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार केला. 'जग हे परिवर्तनशील आहे आणि बदलणे हे जीवंतपणाचे लक्षण आहे. मानवाने आपले विचार आचार आणि जीवनपद्धती परिस्थितीनुसार बदलली पाहिजे' असे सांगून आगरकरांनी 'सुधारक' या वृत्तपत्रातून निखळ बुद्धिवाद प्रथम महाराष्ट्राला शिकवला. म. फुले यांनी 'दीनबंधू' आणि 'सत्यशोधक', जांभेकरांचे 'दर्पण', लोकहितवादींची 'शतपत्रे', आगरकरांचे 'सुधारक,' डॉ. आंबेडकरांचे 'समाजचिंतन' हे ग्रंथ म्हणजे महाराष्ट्राच्या पुरोगामित्वाची नवसंहिताच होय. महाराष्ट्राला पुरोगामी करण्यात सुधारकांचे विचार आणि साहित्य खरे कारणीभूत ठरले आहे. सुधारकांच्या विचारांपासून दुरावणे हाच महाराष्ट्राच्या पुरोगामित्वाचा पराभव म्हणावा लागेल.

**– किशोर गांधी**

# अविनाश पाटील यांना कला गौरव पुरस्कार जाहीर



नगर – आर्ट बिटस् फौंडेशन पुणे तर्फे संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवा कलावंतास दिला जाणारा कला गौरव पुरस्कार या वर्षी तबला वादक अविनाश पाटील रा. खंडाळी, ता मोहोळ यांना जाहीर झाला आहे. या संस्थेचे हे पंचविसावे वर्ष आहे. पाटील हे पं. प्रमोद पाटील व पं. उमेश मोघे यांचे शिष्य आहेत. तबला वादनात त्यांनी संगीत अलंकार व एम ए तबला ही पदवी सुवर्णपदकासह प्राप्त केली आहे. सवाई गंधर्व संगीत महोत्सवासह देशातील अनेक मानाच्या संगीत महोत्सवात त्यांनी आपली कला सादर केली आहे. परदेशातील दुबई, अबुधाबी, मालदीव, नेदरलँड्स, जर्मनी, फ्रान्स, स्वित्झर्लंड, डेन्मार्क, जर्मनी, पोलंड, स्पेन, आयर्लंड, स्कॉटलंड आणी लंडन येथी सोलो तबला वादन सादर करुन जगभरातील संगीत रसिकांची दाद मिळवली आहे.

# नगरमध्ये 'जमाते इस्लामी हिंद'चा ईद मिलन सोहळा उत्साहात

## कुरआनच्या संदेशातून प्रेम, एकता व शांततेचा जागर



ईद मिलन सोहळ्यात मार्गदर्शन करताना स्नेहालय संस्थेचे अ‍ॅड. शाम आसावा (छाया – समीर मन्यार)

नगर – ऐतिहासिक नगर शहरात जमाते इस्लामी हिंदच्या वतीने आयोजित रमजान ईद मिलन सोहळा कासिम खानी मस्जिद येथे उत्साहात पार पडला. दरवर्षीप्रमाणे यंदाही कार्यक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाची सुरुवात पवित्र कुरआन पठणाने झाली. मौलाना हाफिज कय्युम यांनी सुरेल आवाजात कुरआन पठण करून वातावरण भक्तिमय केले. त्यानंतर कुरआनातील हे मानवांनो! आम्ही तुम्हा सर्वांना एका पुरुष आणि स्त्रीपासून निर्माण केले या संदेशाच्या माध्यमातून प्रेम, बंधुभाव आणि शांततेचा प्रभावी संदेश उपस्थितांना देण्यात आला.

अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मिडियमचे शैलेश राशिनकर, इंजिनियर अविनाश कुलकर्णी, डॉ. दत्तात्रेय नागरे, स्नेहालय संस्थेचे अ‍ॅड. शाम आसावा आदींनी समाजात एकता व जातीय सलोखा जपण्याचे आवाहन केले.

प्रमुख वक्ते डॉ. इकराम काटेवाला यांनी आपल्या भाषणात समाजात सलोखा, परस्पर आदर आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना जमाअत–ए–इस्लामी हिंदचे स्थानिक अध्यक्ष नईम सय्यद यांनी मांडली.

सूत्रसंचालन मुश्ताक पठाण यांनी केले, तर आभार प्रदर्शन अ‍ॅड. अश्फाक सय्यद यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जमाते इस्लामी हिंदच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमानंतर उपस्थितांनी अल्पोपहारासह पारंपरिक शिरखुर्म्याचा आस्वाद घेतला.

ईद मिलन सोहळ्यामुळे समाजात एकात्मता, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा जपण्यासाठी मदत होईल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# केडगाव येथील अंबिकानगर स्थानकात भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव उत्साहात

नगर – केडगाव येथील अंबिकानगर स्थानकाच्या प्रांगणात श्रावक संघ अध्यक्ष पन्नालाल बोकरीया यांच्या अध्यक्षतेखाली परमपिता भगवान महावीर स्वामी यांच्या जन्मकल्याणक महोत्सवाचा कार्यक्रम यंदाही उत्साहपूर्ण वातावरणात आणि भक्तिमय जल्लोषात पार पडला. उपप्रवर्तिनी साध्वीरत्न श्री कंचनकवरजी म.सा., श्री सुयशाजी म. सा, श्री दिव्ययशाजी म सा, श्री मलयाजी म. सा. आदि ठाणा यांच्या सानिध्यात हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. परिसरातील जैन बांधवांनी उपस्थित राहून महोत्सवाची शोभा वाढवली.

महोत्सवाची सुरुवात झेंडा चौक, भूषणनगर येथून सकाळी शोभायात्रेने झाली. भगवान महावीर स्वामींच्या जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला होता. विविध सजवलेल्या रथांमधून आणि आकर्षक वेशभूषेत सहभागी झालेल्या भाविकांमुळे शोभायात्रेला विशेष रंगत प्राप्त झाली. महिलांनी लाल साडी तर पुरुषांनी पांढऱ्या वेशभूषेत सहभागी होत पारंपरिक एकात्मतेचे दर्शन घडवले.

शोभायात्रेनंतर स्थानकात प्रवेश होताच पुढील धार्मिक कार्यक्रमांना सुरुवात झाली. या प्रसंगी पाठशाळेतील लहान मुलांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. स्तवन, भजन आणि नवकार महिला मंडळ यांच्या नाटिकेच्या माध्यमातून भगवान महावीरांच्या जीवनातील मूल्ये आणि शिकवण प्रभावीपणे मांडण्यात आली.





केडगाव येथील अंबिकानगर स्थानकाच्या प्रांगणात श्रावक संघ अध्यक्ष पन्नालाल बोकरीया यांच्या अध्यक्षतेखाली परमपिता भगवान महावीर स्वामी यांच्या जन्मकल्याणक महोत्सवाचा कार्यक्रम यंदाही उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

यानंतर महासतीजी कंचनकवरजी म.सा. यांनी आपल्या प्रवचनातून भगवान महावीरांच्या अहिंसा, सत्य आणि संयम या तत्त्वज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी समाजात शांतता, सहिष्णुता आणि सद्भावना टिकवण्यासाठी महावीरांच्या विचारांचे आचरण करण्याचे आवाहन केले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी उपस्थित भाविक भारावून गेले.

कार्यक्रमाच्या शेवटी मंगलपाठ पार पडला. भक्तांनी श्रद्धेने सहभागी होत धार्मिक वातावरणात एकात्मता अनुभवली. त्यानंतर गौतम प्रसादीचे वाटप करण्यात आले, ज्यामध्ये सर्वांनी सहभाग घेतला.

महोत्सवाचे आयोजन श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ, गुरुदेव युवा मंच, तसेच विविध महिला मंडळांनी संयुक्तपणे केले होते. गेल्या दहा वर्षांपासून या ठिकाणी हा महोत्सव सातत्याने साजरा केला जात असून, दरवर्षी त्यामध्ये अधिकाधिक भक्त सहभागी होत आहेत.

आयोजकांनी सर्व घटकांचा समन्वय साधत हा महोत्सव यशस्वीरीत्या पूर्ण केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयुर चोरडीया यांनी केले. सम्राट बरमेचा यांनी आभार मानले.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त

# नगर शहरात ९ एप्रिलला भीमगीतांचा कार्यक्रम



नगर – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर शहरात भीमगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. नगरसेवक सुरेश बनसोडे यांच्या पुढाकारातून होत आहे. ९ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळ्यासमोर, पांजारपोळ मैदान, माळीवाडा, अहिल्यानगर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात गायक आनंद शिंदे यांच्या सादरीकरणातून बाबासाहेबांचा विजय असो, जय भीम म्हणत चला, भीमराजा माझा, निळ्या झेंड्याखाली, भीमाच्या नावानं, माझा भीमराजा महान, उठा उठा हो भीमसैनिकांनो ही गाणी विशेषत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित भीमगीते सादर होणार असून, उपस्थितांना एक वेगळा सांस्कृतिक अनुभव मिळणार आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमासाठी आंबेडकरी समाजासह नागरिक उपस्थित राहण्याचे आवाहन जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# बँकेच्या जनरेटरची बॅटरी चोरट्याने केली लंपास, गुन्हा दाखल

नगर – सावेडी उपनगरातील संजिवनी हॉस्पिटल परिसरातील प्रेमदान हॉटेलच्या पाठीमागे असलेल्या शहर सहकारी बँकेच्या शाखेत चोरीची घटना घडली आहे. चोरट्यांनी बँकेच्या बाहेर जनरेटर सुरू करण्यासाठी ठेवलेली सहा हजार रूपये किंमतीची बॅटरी चोरून नेली.

याप्रकरणी बँकेचे शाखाधिकारी अमित विश्वास कानडे यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. २ एप्रिल रोजी सायंकाळी बँक बंद झाल्यानंतर ते ४ एप्रिल रोजी सकाळी बँक उघडेपर्यंतच्या कालावधीत ही चोरी झाली. अज्ञात चोरट्यांनी परिस्थितीचा फायदा घेत बँकेच्या बाहेर असलेली सहा हजार रूपये किमतीची एक्साईड कंपनीची बॅटरी लंपास केली. बँकेचे कामकाज सुरू करण्यासाठी कर्मचारी आले असता हा प्रकार उघडकीस आला.

# जैन सोशल फेडरेशनने आरोग्य सेवेचा दीपस्तंभ निर्माण केला

## मदन कांकरिया यांचे प्रतिपादन, आनंदऋषीजी नेत्रालयात मोफत नेत्र तपासणी शिबिर



आनंदऋषीजी नेत्रालयाच्या तारकपूर शाखेत नुकतेच मोफत नेत्र तपासणी व उपचार मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले.

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी हॉस्पिटल यांचे आशीर्वाद आणि प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने आरोग्यं सेवेचा दीपस्तंभ निर्माण करण्याचे काम जैन सोशल फेडरेशन अविरतपणे करत आहे. समाजात विशेषतः ग्रामीण भागात डोळ्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. परिणाम दृष्टीदोष वाढतो. यासाठी आनंदऋषीजी नेत्रालयाच्या माध्यमातून वेळोवेळी शिबिरे घेऊन जास्तीत जास्त रूग्णांचा दृष्टीदोष बरा करण्याचं काम येथील तज्ज्ञ डॉक्टरांची टीम करत आहे. अत्याधुनिक नेत्रोपचार सुविधा रूग्णांना मिळण्यासाठी स्व. कुंदन कांकरिया यांनी नेत्रालयाच्या स्थापनेपासून योगदान दिले. त्यांचे हे कार्य पुढे कायम ठेवण्यासाठी कांकरिया परिवार भविष्यातही निश्चित योगदान देईल अशी ग्वाही मदन कांकरिया यांनी दिली.

आनंदऋषीजी नेत्रालयाच्या तारकपूर शाखेत नुकतेच मोफत नेत्र तपासणी व उपचार मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी भवरीलाल कांकरिया बोलत होते. यावेळी मदन कांकरिया, अभय कांकरिया व कांकरिया परिवारातील सदस्य तसेच जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, बाबूशेठ लोढा, डॉ. आशिष भंडारी, नेत्र तज्ञ डॉ. अशोक महाडिक, डॉ. प्रतिक कटारिया, आनंद छाजेड आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले, आनंदऋषीजी नेत्रालय येथे जागतिक दर्जाच्या नेत्रोपचार सुविधा उपलब्ध आहेत. नगरसह मराठवाड्यातील रूग्णांना याचा लाभ होत असतो. सावेडी उपनगरातील नागरिकांच्या सोयीसाठी तारकपूर येथे शाखा सुरू करण्यात आली. याठिकाणी गेल्या ५ महिन्यात ५००० पेक्षा जास्त रुग्णांनी सेवेचा लाभ घेतला व २०० पेक्षा अधिक नेत्र शस्त्रक्रिया करण्यात आल्या. स्व. कुंदन कांकरिया यांनी जैन सोशल फेडरेशनच्या कार्यात योगदान देताना नेत्रालयाच्या विस्तारात मोठे योगदान दिले. त्यांच्या सेवाभावी स्वभावामुळे असंख्य रुग्णांना निर्दोष दृष्टी मिळण्यास हातभार लागला आहे. त्यांच्या स्मृती कायम जपण्याचा प्रयत्न राहील. शिबिरात ९० रूग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली.

सूत्रसंचालन आनंद छाजेड यांनी केले. डॉ. प्रतिक कटारिया यांनी आभार मानले.

# श्री रुक्मिणी सहकारी बँकेला आर्थिक वर्षात ७.३८ कोटी रुपयांचा ढोबळ नफा

नगर – श्री रुक्मिणी सहकारी बँकेने ३१ मार्च रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेचे चेअरमन सी.ए. वसंतराव बापूराव गुंड व व्हा. चेअरमन सी.ए. सुरेश रावसाहेब गावडे यांच्या नेतृत्वाखाली व बँकेचे मुख्य अधिकारी प्रदीप जालिंदर जगताप व सुनिल नामदेव जगताप यांचे प्रशासकीय उत्तम कामकाजामुळे बँकेने नेत्रदीपक कामगिरी केलेली आहे. सन २०२५–२६ या आर्थिक वर्षात बँकेला रु. ७.३८ कोटींचा ढोबळ नफा झाला असून सर्व तरतुदी करून निव्वळ नफा रु. ३.२० कोटी झाल्याची माहिती बँकेचे व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. पांडुरंग गुंड यांनी दिली.

श्री रुक्मिणी सहकारी बँकेने स्थापनेपासून विकासाच्या दिशेने यशस्वी घोडदौड कायम सुरु ठेवलेली आहे. नुकत्याच झालेल्या ३१ मार्च २०२६ च्या आर्थिक पत्रकानुसार बँकेला ढोबळ नफा रु. ७ कोटी ३८ लाख झालेला आहे. बँकेने केवळ नफ्यातच नाही तर एकूण व्यवसाय वाढीतही मोठी झेप घेतलेली आहे. बँकेने रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व सहकार खाते यांच्या आर्थिक निकषाचे पालन करून यश मिळविले आहे. बँकेचा चोख व पारदर्शक व्यवहार पद्धतीमुळे सभासद, ग्राहक व ठेवीदारांचा बँकेवर अतूट विश्वास आहे. त्यामुळे बँकेकडे एकूण रु. २२३ कोटी ७ लाख रुपयांच्या ठेवी आहेत. चालू वर्ष अखेर बँकेचे रु. १५६ कोटी १ लाख रुपयांचे कर्जवाटप आहे. बँकेची एकूण गुंतवणूक रु. १०० कोटी ५९ लाख असून भांडवल पर्याप्तता प्रमाण (सी.आर.ए.आर.) २३.६२ टक्के आहे. पी.सी.आर १०२ टक्के आहे. नेटवर्थ रु. २७ कोटी ७७ लाख असून बँकेचा एकूण एकत्रित व्यवसाय रु. ३७९ कोटी ८ लाख आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे उत्तम प्रशासकीय कौशल्याच्या जोरावर सालाबादप्रमाणे बँकेने आपला नेट एन.पी.ए. शून्य टक्के राखलेला आहे. तसेच बँकेने चालू आर्थिक वर्षाच्या उत्पन्नावर एकूण रु. १ कोटी ४८ लाख इतका आयकर भरणा केलेला आहे. बँक सभासदांना नियमित लाभांश वाटपात नेहमीच अग्रेसर राहिलेली आहे. सदरची ही आकडेवारी बँकच्या भक्कम आर्थिक स्थितीची साक्ष देत आहे. बँकेचे चेअरमन, व्हा. चेअरमन, व्यवस्थापन मंडळ व संचालक मंडळ यांचेकडून मिळणारे नियमित मार्गदर्शन व उत्तम प्रशासन, बँकिंग डिजिटल सेवा, पारदर्शक कारभार आणि बँकेच्या सर्व अधिकारी व सेवकांचे योगदान, कौशल्य, प्रामाणिकपणा आणि निष्ठेमुळेच एवढे मोठे यश मिळवत आल्याचे बँकेचे व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. पांडुरंग विठ्ठल गुंड यांनी सांगितले.


## अखिल भारतीय स्तरावरील बोरा परिवारांचे १२ एप्रिल रोजी पहिले एक दिवसीय संमेलन

नगर – संपूर्ण भारतात जैन समाजातील सर्व प्रकारचे बोरा परिवार विविध ठिकाणी वास्तव्यास आहेत. नोकरी, व्यवसायानिमित्त विविध ठिकाणी स्थायिक झालेल्या सर्व बोरा परिवारांना एका व्यासपीठावर आणून आपापसात संवाद व्हावा, एकोपा वृद्धिंगत व्हावा, विचारांचे आदानप्रदान व्हावे यासाठी अखिल भारतीय बोरा फाउंडेशन, पुणे यांच्या तर्फे जैन समाजातील सर्व प्रकारच्या बोरा परिवारांचे अखिल भारतीय स्तरावरील पहिले एक दिवसीय संमेलन आयोजित करण्यात आले आहे. १२ एप्रिल रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५:३० यावेळेत श्री वर्धमान सांस्कृतिक भवन, बिबवेवाडी, पुणे येथे हे संमेलन होणार आहे.

या संमेलनामध्ये महाराष्ट्र तसेच भारतभरातील जैन समाजातील सर्व प्रकारचे बोरा परिवार सहभागी होत आहेत. इतिहासात प्रथमच सर्व बोरा परिवार एकत्र येणार आहेत. आपापसात परिचय वाढून सुसंवाद साधण्याची संधी यामुळे मिळणार आहे. अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातील बोरा परिवाराच्या सदस्यांनी या ऐतिहासिक संमेलनाला उपस्थित राहाव असे आवाहन अखिल भारतीय बोरा फाउंडेशन तर्फे सर्व बोरा परिवारांना करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क – संजय बोरा (मो. ९८२२२ ८७४३९), प्रकाश बोरा (मो. ९८५०८ ८८८८४)

# अहिल्यानगर शहरात प्रथमच युवकांचे प्रेरणास्थान इंद्रेश उपाध्याय यांच्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे १२ ते १८ एप्रिल दरम्यान आयोजन

### जय्यत तयारी सुरू : विविध समित्यांची स्थापना : ११ एप्रिलला शोभायात्रा



नगर – अहिल्यानगरमध्ये प्रथमच १२ ते १८ एप्रिल दरम्यान युवकांचे प्रेरणास्थान असलेल्या वृंदावन निवासी इंद्रेश उपाध्याय यांच्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त ११ एप्रिल ला सायंकाळी ४ वाजता शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती आयोजक आयुष गुप्ता यांनी दिली.

सुधीर झालानी, किसनलाल बंग, महेश गुप्ता व प्रदिप पंजाबी म्हणाले, श्रीमती कौशल्यादेवी गौरीशंकरजी गुप्ता यांच्या प्रेरणेने इंद्रेश उपाध्याय यांना प्रथमच नगर शहरात आणण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

इंद्रेश उपाध्याय यांचे अध्यात्मिकता, विनम्रता आणि भक्तीने ओतप्रोत भरलेले जीवन आजच्या युवकांचे विशेष आकर्षण ठरले आहे. भारतीय संत आणि ऋषी–मुनींचा अध्यात्मिकतेचा वारसा युवकांच्या हाती देण्याचे ध्येय समोर ठेवून ते कार्यरत आहेत. साधेपणा आणि सेवा यावर भर देत अध्यात्मिक जीवनशैलीचे महत्त्व ते प्रतिपादन करतात. गोमातांची सुरक्षितता ही सामाजिक जबाबदारी असून गोमातेची सेवा ही भक्तीच होय, असे ते सांगतात.

११ एप्रिलला सायंकाळी ४ वाजता सावेडी मधील मिस्कीन मळ्यातील खंडेलवाल सांस्कृतिक भवन पासून शोभायात्रा निघेल. ही शोभायात्रा प्रोफेसर कॉलनी, आकाशवाणी मार्गे कथा स्थळी येईल. शोभायात्रेच्या अग्रभागी दोन बग्गी असतील. त्यामध्ये श्रीमद् भागवत ग्रंथ आणि राधा–कृष्णाचे वेशभूषेत मुलं रहातील. बॅण्ड पथक, ढोल पथक, वारकरी वेशभूषेतील पथक, मंगल कलश घेतलेल्या १०८ युवती आणि सुवासिनी तसेच शहरासह उपनगरातील स्त्री – पुरुष भाविक शोभायात्रेत सहभागी होतील. शोभायात्रा मार्गावर ठिकठिकाणी पुष्पवृष्टी केली जाईल. शोभायात्रा कथास्थळी आल्यावर श्रीमद् भागवत ग्रंथाची सामुदायिक महाआरती करण्यात येईल.

१२ एप्रिलला दुपारी ३.३० वाजता श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचा शुभारंभ विधीवत करण्यात येईल. या सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली असून उत्तम नियोजनासाठी शहरातील भाविकांच्या विविध समिती स्थापन करण्यात आल्या आहेत.

शहराच्या सर्व भागातील भाविकांनी विशेषतः युवक–युवतींनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक श्रीमती कौशल्यादेवी गौरीशंकर गुप्ता, आयुष गुप्ता, महेश गुप्ता, सुधीर झालानी, प्रदिप पंजाबी, किसनलाल बंग प्रभूतींनी केले आहे.

# जिल्हा परिषद शाळा ही ग्रामीण भागातील ज्ञानमंदिर

### राणीताई लंके यांचे प्रतिपादन

नगर – क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी मुलींना शिक्षणाची दारे खुली करून दिली, त्याच परंपरेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद शाळांच्या माध्यमातून शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. जिल्हा परिषद शाळा ही ग्रामीण भागातील ज्ञानमंदिर असून बालवयातच सुसंस्कृत विद्यार्थी घडविण्याचे कार्य या शाळांमधून होत असल्याचे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद सदस्य राणीताई लंके यांनी केले.



नगर तालुक्यातील अरणगाव शिंदेवाडी जिल्हा परिषद शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात झाले. या कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद सदस्य राणीताई लंके उपस्थित होत्या.

### अरणगाव शिंदेवाडी जिल्हा परिषद शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

नगर तालुक्यातील अरणगाव शिंदेवाडी जिल्हा परिषद शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात झाले. या कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद सदस्य राणीताई लंके, संदेश कार्ले, सरपंच पोपटराव पुंड, किसन लोटके, मुख्याध्यापिका जयश्री घोलप, राधाकिसन गिरवले गुरुजी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संदीप शिंदे, शिक्षण प्रेमी पोपट शिंदे, दत्तात्रय शिंदे, अमित शिंदे, बबन शिंदे, बाळू शिंदे, गोरख शिंदे, मिनीनाथ शिंदे, अंशाबापू शिंदे, ॲड. शिवाजी शिंदे, गणपत शिंदे, नाथा शिंदे, किरण शिंदे, अनिल शिंदे, संतोष शिंदे, शरद डमढेरे, प्रभाकर शिंदे, देविदास वाळके, अर्जुन लोटके आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

राणीताई लंके यांनी सांगितले की, जिल्हा परिषद शाळेमधील विद्यार्थी आज विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवत आहेत. शिंदेवाडी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून आपल्या संस्कृतीचे जतन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आपला वारसा पोहोचविण्याचे काम या उपक्रमातून होत आहे. माझेही शिक्षण याच शाळेत झाले असून या शाळेने मला घडवले, असे सांगत त्यांनी बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला.

सरपंच पोपटराव पुंड यांनी सांगितले की, स्पर्धेच्या युगात शिक्षणाला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. जिल्हा परिषद शाळांच्या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबवणे गरजेचे असून त्यातून विद्यार्थ्यांना आपले कलागुण सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळते. अरणगाव ग्रामपंचायत शाळेच्या विकासासाठी कटिबद्ध असून विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

मुख्याध्यापिका जयश्री घोलप यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये बालवयातच शिक्षणाबरोबरच सांस्कृतिक, क्रीडा, नाट्य, गायन या क्षेत्रांबद्दल आवड निर्माण व्हावी यासाठी शाळेमार्फत वर्षभर विविध उपक्रम राबवले जातात. आधुनिक युगात करिअरच्या विविध संधी उपलब्ध असून विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्यासाठी शाळा महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

संदीप शिंदे यांनी सांगितले की, शिंदेवाडी येथे अंगणवाडी ते चौथीपर्यंत शिक्षण उपलब्ध असून बालवयातच विद्यार्थ्यांचा पाया भक्कम करण्यासाठी ग्रामस्थ नेहमी शिक्षकांना सहकार्य करतात.

विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमातून अध्यात्मिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक कलागुण सादर केले. सण–उत्सवांच्या माध्यमातून आपली संस्कृती जोपासली जाते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार बालवयातच विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक असून ते प्रेरणादायी आहेत.

स्नेहसंमेलनात बालकलाकारांनी विविध सादरीकरणे करून पालक व ग्रामस्थांची मने जिंकली. कार्यक्रमाचे नियोजन व यशस्वी आयोजनासाठी शिक्षक व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे कौतुक करताना उपस्थितांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या पॅनल विधीज्ञांची नियुक्ती जाहीर

### ॲड. महेश शिंदे, ॲड. सुरेश लगड, ॲड. शिवाजी कराळे व ॲड. अनिता दिघे यांचा समावेश



नगर – जिल्हा व सत्र न्यायालयातंर्गत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या पॅनल विधीज्ञांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष न्यायाधीश शिवाजीराव कचरे व सचिव योगेश पैठणकर यांच्या मार्गदर्शनाखाली या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

या पॅनलमध्ये ॲड. महेश शिंदे, ॲड. सुरेश लगड, ॲड. शिवाजी कराळे व ॲड. अनिता दिघे यांची तीन वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व वकिलांच्या सामाजिक व वकीली व्यवसायाच्या कामाची दखल घेऊन त्यांची नियुक्ती झाली आहे.

ॲड.महेश शिंदे गेल्या पंधरा वर्षांपासून कौटुंबिक न्यायालय, धर्मदाय उपायुक्त कार्यालय येथे वकिली व्यवसाय करीत असून, जय युवा अॅकॅडमीच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण, बेटी बचाव बेटी पढाव, मोफत आरोग्य शिबिर व स्वच्छता अभियान यासह शासनाचे विविध प्रकल्पात आणि सामाजिक कार्यात जिल्हाभरात कार्य करत आहे.

ॲड.सुरेश लगड हे विशेष सरकारी वकील असून, अनेक वर्षांपासून वकिली व्यवसायाचा त्यांना प्रदीर्घ अनुभव आहे. त्याचबरोबर विविध सामाजिक संस्थांना व नवोदित वकिलांना मार्गदर्शन, युवकांचे विविध उपक्रम सातत्याने राबवित असतात. अहमदनगर बार असोसिएशनचे ते माजी अध्यक्ष आहेत. त्यांची फेरनिवड झाली आहे.

ॲड.शिवाजी कराळे हे मागील २५ वर्षापासून वकीली व्यवसाय करत आहे. ते देखील सामाजिक कार्याशी जोडलेले असून, विविध सामाजिक कार्यात त्यांचे योगदान असते. अहमदनगर बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष असून, कौटुंबिक न्यायालयाचे संस्थापक अध्यक्ष आहेत.

ॲड.अनिता दिघे या अहमदनगर बार असोसिएशनच्या माजी सचिव असून, आधारवड बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून महिला व युवतींसाठी विविध उपक्रम राबवित आहेत.




श्रीमद भागवत कथेचे निरूपण करताना गोवत्स श्री राधाकृष्ण महाराज. समवेत भास्करगिरी महाराज आदी. शेजारील छायाचित्रात भागवत्कथा ऐकण्यासाठी भाविकांची झालेली गर्दी.

# गुरु हे भक्तांना परमेश्वराशी एकरुप करतात

### हभप राधाकृष्ण महाराज यांचे निरुपण, गुरुदत्त भक्तीचा मंदिरात सदिच्छा भेट

नगर – नंदनवन लॉन्स, न्यू टिळक रोड येथे रामनिवास सतीशचंद्र इंदाणी यांनी ३ ते ९ एप्रिल या कालावधीत श्रीमद भागवत कथेचे दुपारी २ ते ६ यावेळी कथेचे आयोजन केले आहे. जोधपूर येथील गोवत्स श्री राधाकृष्ण महाराज यांच्या रसाळ वाणीतून श्रीमद भागवत कथेचे निरूपण केले जात आहे.

संत किसनगिरीनगर येथील गुरुदत्त भक्तीधाम येथे गोवत्स श्री राधाकृष्ण महाराज यांनी सदिच्छा भेट दिली असता देवगड देवस्थानचे महंत हभप भास्करगिरी महाराज यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी संतांचा अनोखा मिलाप व प्रवचनाचा लाभ भक्तांनी घेतला.

यावेळी राधाकृष्ण महाराज म्हणाले, गुरुदत्त भक्तीधाम मंदिराचा कळस जसा चमकदार आहे तसा मंदिराचा पाया ह भक्कम आहे. येथे सद्गुरू किसनगिरी बाबांची कृपा आहे असे दिसते. या मंदिरात आल्यानंतर देवगडच्या दत्त मंदिरात आल्यासारखेच वाटत आहे. मन प्रसन्न होते. देवगडच्या मंदिराची शिस्त, स्वच्छता व अनुशासन याचे दर्शन या गुरुदत्त भक्ती दाम मंदिरात झाले आहे. गुरु आपल्या जीवनात येतात, प्रत्येक जीवाला भगवंताची जोडण्यासाठी येत असतात. गुरु हे स्वतःला जोडण्यासाठी नाही तर परमेश्वराला भक्तांशी जोडण्यासाठी असतात. ज्या भक्तांवर सद्गुरुकृपा आहे. त्यांनाच भास्करगिरीजी बाबा यांच्यासारखे गुरु मिळतात.

श्री क्षेत्र देवगड येथे अधिकमास निमित्त २१ ते २७ मे या कालावधीमध्ये विठ्ठल रस भक्ती महोत्सव चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये श्रीमद् भागवत कथा, कीर्तन तसेच नामदेव भक्ती, तुकाराम भक्ती, तसेच संतांच्या सानिध्यात कथा कीर्तन रस कुंभ होत आहे. याचा सर्व भक्तांनी लाभ घ्यावा. असे आवाहन हभप राधाकृष्ण महाराजांनी केले आहे.

हभप भास्करगिरी महाराज म्हणाले, गुरुदत्त भक्तीधाम मंदिरात गोवत्स श्री राधाकृष्ण महाराज यांनी सदिच्छा भेट दिली हा दिवस सुवर्ण अक्षरांमध्ये लिहून ठेवण्यासारखा आहे. गुरु हे सर्वश्रेष्ठ आहे. गुरूंप्रती नतमस्तक रहावे. देवाने संत भिन्न नाहीत. देवावर गुरूंवर श्रद्धा ठेवा, धर्मावर निष्ठा बळकट करा, देव देश आणि धर्मासाठी कार्य करा. सद्गुरु हे भक्तिमार्ग सांगत असतात. निस्वार्थ भक्तीने परमेश्वराची प्राप्ती होते. भगवान श्री दत्तात्रय यांच्या कृपेने जीवन सफल होते.

गुरुदत्त भक्तीधाम मंदिरात संत मिलनाने भाविक मंत्रमुग्ध झाले. याप्रसंगी पाईपलाईन रोड, किसनगिरीनगर परिसरातील भाविक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी सद्गुरु किसनगिरीबाबानगर भक्त मंडळ व बन्सी महाराज मिठाईवाले यांनी परिश्रम घेतले.

# द आयकॉन स्कूलमध्ये विद्यार्थी कौन्सिलचा पदग्रहण सोहळा उत्साहात



द आयकॉन पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थी कौन्सिलचा पदग्रहण सोहळ्यामध्ये संचालक कर्नल आर. सी. राणा यांच्या हस्ते नवीन कौन्सिलला शपथ देण्यात आली.

नगर – द आयकॉन पब्लिक स्कूल, आहिल्यानगर येथे शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला संस्थेचे संचालक, प्राचार्या दिपिका नगरवाला, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य, शिक्षकवर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. या समारंभातून जुन्या स्टुडंट कौन्सिलमधील पदाधिकाऱ्यांकडून नवीन कौन्सिलकडे जबाबदाऱ्यांचे औपचारिक हस्तांतरण करण्यात आले. विश्वास, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांचे प्रतीक म्हणून हा समारंभ पार पडला. टायटन, युनिकॉर्न, फिनिक्स आणि ट्रोजन या चार हाऊसच्या रंगतदार सादरीकरणातून 'एकतेत विविधता' हा संदेश अधोरेखित झाला.

नवीन कौन्सिलला बॅच व सॅश देऊन सन्मानित करण्यात आले. शाळेचे कॅप्टन म्हणून भार्गव पिंपळे आणि बानी मकर, तर क्रीडा कॅप्टन म्हणून युवान शर्मा आणि वैष्णवी जगताप यांची निवड करण्यात आली. हाऊस कॅप्टन म्हणून अनुज दरेकर व राधिका पाटील (टायटन), जयदीप करपे व आर्या चोरबेले (फिनिक्स), आदित्य जगताप व सिया सुराणा (युनिकॉर्न) तसेच सम्यक मुनोत व अस्मी खटाळ (ट्रोजन) यांनी पदभार स्विकारला.

संचालक कर्नल आर. सी. राणा यांच्या हस्ते नवीन कौन्सिलला शपथ देण्यात आली. त्यांनी शाळेच्या मूल्यांचे पालन करत प्रामाणिकपणे कार्य करण्याची प्रतिज्ञा केली. यावेळी विविध क्षेत्रांतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. 'आयकॉन लीडरशिप अवॉर्ड' अथर्व माहेश्वरी आणि विधी नरुला यांना प्रदान करण्यात आला. 'बेस्ट ऑल–राऊंडर' पुरस्कार अथर्व माहेश्वरी यांना देण्यात आला. 'स्पोर्ट्स कॅप्टन' पुरस्कार प्रणव सैधणे आणि अवंतिका सोनवणे यांना, तर 'बेस्ट इन स्पोर्ट्स' पुरस्कार प्रणव सैधणे यांना देण्यात आला.

शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठीचा 'चॅम्पियन हाऊस ट्रॉफी' टायटन हाऊसला प्रदान करण्यात आली. कार्यक्रमात शाळेच्या 'अभिव्यक्ती' या मासिकाचे प्राचार्या, संचालक व व्यवस्थापन सदस्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. मुख्य संपादक अँजेलिना पाटोले, डिझाईन प्रमुख प्राची गिरधर, विद्यार्थी संपादक विधी नरुला आणि सहाय्यक संपादक शास्त्रिक रूपवते यांनी या मासिकाच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावली.

समारोप प्रसंगी प्राचार्या दिपिका नगरवाला यांनी विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणे, जबाबदारीने आणि संवेदनशीलतेने नेतृत्व करण्याचा संदेश दिला. या प्रसंगी संस्थेच्या पॅट्रन मंगला मुथा, चेअरमन अशोक मुथा, डायरेक्टर ॲडमिनिस्ट्रेशन कर्नल आर. सी. राणा तसेच ट्रस्टी निर्मल मुथा व अमित मुथा यांनी शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# 'रंग भरो अहिंसा एवं उज्ज्वल कल के' चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

नगर – भगवान महावीर स्वामींच्या जन्मकल्याणक महोत्सवाचे औचित्य साधून, महावीर इंटरनॅशनल (वीर–वीरा–मिरॅकल सेंटर) आणि रमेशचंद्रजी बाफना मेमोरियल फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली 'रंग भरो अहिंसा एवं उज्ज्वल कल के' ही चित्रकला स्पर्धा ३.० रविवारी येथील आनंदधाममध्ये उत्साहात झाली. सकाळी ७:३० वाजल्यापासूनच आनंदधामचा परिसर चिमुकल्यांच्या गर्दीने आणि उत्साहाने फुलून गेला होता. 'भगवान महावीर यांच्या जीवनातील अहिंसेचे महत्त्व' हा मुख्य विषय घेऊन आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत अहिल्यानगरमधील विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. ही स्पर्धा एकूण तीन वयोगटात घेण्यात आली. ८ वर्षांपर्यंतच्या (गट १) आणि ९ ते १३ वयोगटातील (गट २) विद्यार्थ्यांनी त्यांना दिलेल्या रेखाचित्रात कल्पकतेने रंग भरले. तर १४ वर्षांपुढील (गट ३) विद्यार्थ्यांनी 'दैनंदिन जीवनातील अहिंसेचे महत्त्व' या विषयावर स्वतःची कल्पकता वापरून अत्यंत प्रभावी चित्रे रेखाटली. केवळ ४५ मिनिटांच्या मर्यादेत मुलांनी आपल्या कलेच्या माध्यमातून भगवान महावीरांच्या विचारांची मांडणी केली.



या उपक्रमाचे नियोजन महावीर इंटरनॅशनलचे वीर अध्यक्ष राजेंद्र बोथरा, वीरा अध्यक्षा वर्षा बाफना आणि मिरॅकल अध्यक्ष चेतन संचेती यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी मिरॅकल उपाध्यक्ष निशांत कर्नावट, सचिव निलेश बोथरा, कोषाध्यक्ष अमित पारख तसेच नूतन संचेती, तृप्ती देसरडा, राणी पारख, प्रगती कोठारी, रुपाली बाफना, चेतना कर्नावट, स्नेहल बोथरा आणि मेरु कर्नावट या सदस्यांनी परिश्रम घेतले

महावीर इंटरनॅशनलचे वीर अध्यक्ष राजेंद्र बोथरा म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या आणि हिंसक वातावरणात भगवान महावीरांचे 'अहिंसा परमो धर्म' हे तत्वज्ञान केवळ पुस्तकात मर्यादित न राहता ते लहान मुलांच्या संस्कारात उतरणे गरजेचे आहे. चित्रकला हे अभिव्यक्तीचे उत्तम माध्यम आहे, ज्यातून मुले अहिंसेचा विचार अधिक प्रभावीपणे आत्मसात करू शकतात. महावीर इंटरनॅशनल अशा उपक्रमांतून भावी पिढीमध्ये मानवी मूल्यांची रुजवणूक करण्याचा निरंतर प्रयत्न करत राहील.

मिरॅकल अध्यक्ष वीर चेतन संचेती यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की, मिरॅकल सेंटरच्या माध्यमातून आम्ही नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवतो. 'रंग भरो' स्पर्धेचे हे तिसरे वर्ष असून, यंदाचा प्रतिसाद थक्क करणारा आहे. मुलांनी केवळ चित्र काढले नाही, तर भगवान महावीरांच्या जीवनातील प्रसंग जिवंत केले आहेत. या स्पर्धेच्या माध्यमातून आम्ही मलांमधील कलागुणांना वाव देण्यासोबतच त्यांना शांततामय जीवन जगण्याची प्रेरणा देत आहोत.

चित्रकार सोनिया भंडारी यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले. मुलांच्या कल्पकतेचे कौतुक करताना त्यांनी सांगितले की, आजच्या धावपळीच्या युगात अहिंसेचा विचार चित्रांच्या माध्यमातून मुलांच्या मनात रुजवणे, हीच या स्पर्धेची सर्वात मोठी उपलब्धी आहे.

विजेत्यांना आकर्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच प्रत्येक सहभागी स्पर्धकाला प्रोत्साहनपर प्रमाणपत्र देण्यात आले.



# टेस्टी नाश्ता

खादाडी

दोस्तांनो, सकाळचा नाश्ता म्हणून किंवा अगदी संध्याकाळचं खाणं म्हणून तुम्ही एग अँड बनाना पॅन केक बनवू शकता. पटकन होणारी, अगदी साधी आणि सुटसुटीत अशी ही रेसिपी तुमच्यासाठी अगदी योग्य आहे.

**साहित्य :** दोन अंडी, एक मध्यम आकाराचं केळं, किसलेलं खोबरं, वेलची किंवा दालचिनी पूड, सुकामेवा. फक्त अंडं आणि केळं या दोन घटकांचा वापर करूनही पॅनकेक तयार करता येईल.

**कृती:** एका भांड्यात केळं कुस्करून घ्या. दोन अंडी फोडून फेटून घ्या. ही फेटलेली अंडी केळ्यात नीट मिसळून घ्या. त्यात आवडीनुसार खोबरं, सुकामेवा, वेलची पूड घाला. आता गॅसवर तवा ठेवा. त्यावर तेल किंवा बटर घाला. केळं आणि अंड्याचं मिश्रण तव्यावर पसरून घ्या. एका बाजूने शिजल्यावर केक उलटा. दुसरी बाजू नीट भाजली गेली की ताटात काढून घ्या. हा केक गरम किंवा थंड कसाही खाता येईल.




# लाखोंची नोकरी सोडून लोणच्याचा व्यवसाय

अचिव्हर

आनंद कश्यप हे एका मध्यमवर्गीय कुटुंबातून येतात. त्यांचे आजोबा शेतकरी होते आणि लहानपणापासूनच ते निसर्ग आणि शेतीच्या जवळ वाढले. याच वातावरणामुळे त्यांना शुद्ध आणि रसायनमुक्त अन्नाचे महत्त्व समजले. आज ते 'ऑरगॅनिक आनंद' या ब्रँडचे संस्थापक आहेत.

आनंद यांनी २००९ मध्ये 'गोविंदराम सेकसरिया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स' येथून सिव्हिल इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी मल्टिनॅशनल आणि सरकारी कंपन्यांमध्ये १२ वर्षांहून अधिक काळ काम केले. त्यांचा वार्षिक पगार २० ते ३० लाख रुपयांच्या दरम्यान होता. सर्व काही ठीक असूनही त्यांना स्वतःचे काहीतरी करावे, असे वाटू लागले. पत्नीचा पाठिंबा आणि आईच्या लोणचे बनवण्याच्या मिळालेल्या प्रेरणेने त्यांनी नोकरी सोडण्याचे धाडस केले.




आनंद यांच्या आई पारंपरिक पद्धतीने, कोणत्याही रसायनाशिवाय लोणचे बनवत असत. त्यांच्या आंब्याच्या लोणच्याला मित्र-नातेवाइकांमध्ये खूप मागणी होती. इथूनच आनंद यांना हा स्वाद मोठ्या प्रमाणावर लोकांपर्यंत पोहोचवण्याची कल्पना सुचली. २०२१ मध्ये कोविडच्या दुसऱ्या लाटेदरम्यान त्यांनी नोकरी सोडून 'ऑरगॅनिक आनंद'ची सुरुवात केली.

सुरुवातीची गुंतवणूक सुमारे चार लाख रुपये होती. नंतर ती १० लाख रुपयांपेक्षा जास्त झाली. पहिल्या महिन्याची कमाई ३० हजार रुपयांपेक्षाही कमी होती. ते स्वतःच उत्पादन, पॅकेजिंग, मार्केटिंग आणि ग्राहक सेवा सांभाळत होते. ऑनलाइन विक्रीचा अनुभव कमी होता आणि ग्राहकांपर्यंत पोहोचणे सोपे नव्हते. पण सतत शिकण्याच्या जिद्दीने त्यांनी पुढे वाटचाल केली. २०२२ मध्ये आनंद यांनी वॉलमार्ट वृद्धि प्रोग्राम जॉइन केला. येथे त्यांना योग्य प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळाले. त्यांनी ऑनलाइन प्रझेन्स सुधारला. पॅकेजिंग प्लास्टिकऐवजी काचेच्या बाटल्यांमध्ये केले आणि सप्लाय चेन मजबूत केली. यामुळे ब्रँडची विश्वासार्हता आणि विक्री दोन्ही वाढली.



आज या ब्रँडकडे लोणची, कँडी, मधावर आधारित उत्पादने, हर्बल आणि हेअरकेअर या श्रेणींमध्ये सुमारे १०० एसकेयू आहेत. तीन वर्षांत मासिक कमाई ३० हजार रुपयांवरून वाढून दहा लाख रुपयांपर्यंत पोहोचली आहे. हा प्रवास एका छोट्या शहरातून मोठ्या स्वप्नापर्यंत पोहोचण्याचे उदाहरण ठरला आहे. आनंद आता हेल्दी कँडी आणि हर्बल उत्पादनांवर लक्ष केंद्रित करत आहेत. मेहंदी, इंडिगो, शतावरी आणि अश्वगंधा यांसारखी उत्पादने त्यांनी लाँच केली आहेत. ते ई-कॉमर्स वाढवून आणि देशभरात वेअरहाऊस उभारून डिलिव्हरी जलद करण्याची योजना आखत आहेत.

## फंडू एसएमएस

किसी को भी व्होट मिले
किसी का भी प्रचार हो,
बस तू मेरा रहे,
इस दिल में तेरीही सरकार हो।

सारे दोस्त काम के,
सबका अपना रोल,
जो संकट में साथ दे,
वो है सबसे अनमोल।

कामियाबी का
जुनून होना चाहिये
फिर मुश्किलों की
क्या औकात?

## टेक्नो टॉक


### गुगल क्रोमवर हॅकर्सचे हल्ले?



'गुगल क्रोम' वापरणाऱ्या जगभरातील ३.५ अब्ज लोकांसाठी खबरदारीचा अलर्ट आला याआहे. 'गुगल'ने नुकताच एक गंभीर 'झिरो डे' सुरक्षा त्रुटीचा गौप्यस्फोट केला आहे. या त्रुटींमुळे (सीव्हीई-२०२६-३९०९ आणि सीव्हीई-२०२६-३९१०) हॅकर्स आधीच हल्ले करत आहेत. हे दोन धोकादायक दोष क्रोमच्या स्किया ग्राफिक्स लायब्ररी आणि व्ही ८ जावास्क्रिप्ट इंजिनमध्ये आढळले आहेत. फक्त एका खतरनाक वेबसाइटला भेट दिल्याने हॅकर तुमच्या ब्राउझरमध्ये मनमानी कोड चालवू शकतात, पासवर्ड, बँक डिटेल्स किंवा फोटो चोरू शकतात. 'झिरो डे' म्हणजे अशी त्रुटी आहे, जी शोध लागताच हॅकर्स ताबडतोब वापरतात. कंपनीला दुरुस्ती करण्यासाठी वेळच मिळत नाही. क्रोम जगातील सर्वाधिक लोकप्रिय ब्राउझर असल्याने हा धोका खूप मोठा आहे. 'गुगल'ला या त्रुटींची माहिती १० मार्चला मिळाली आणि लगेच इमर्जन्सी अपडेट जारी केले. आता क्रोमची नवीन आवृत्ती १४६.०.७६८०.७५/७६ उपलब्ध आहे. अमेरिकेच्या सायबर सुरक्षा विभागाने (सीआयएसए)ही सर्वांना त्वरित अपडेट करण्याचे आदेश दिले आहेत. या हल्ल्यांमुळे ब्राउझर क्रॅश होऊ शकतो किंवा हॅकर तुमच्या कॉम्प्युटरवर पूर्ण नियंत्रण मिळवू शकतात. विशेषतः ऑनलाइन बँकिंग, शॉपिंग किंवा ईमेल वापरणाऱ्यांसाठी हा धोका गंभीर आहे. हॅकर्स बनावट वेबसाइट्स किंवा लिंक्स पाठवून लोकांना फसवतात. क्रोम उघडा, वरच्या उजव्या कोपऱ्यात तीन ठिपके क्लिक करा, 'हेल्प'वर जा आणि 'अबाऊट गूगल क्रोम' निवडा. नवीन अपडेट आपोआप डाउनलोड होईल. अपडेट पूर्ण झाल्यावर ब्राउझर रीस्टार्ट करा. हे केल्याने त्रुटी दूर होतात आणि तुमची सुरक्षा मजबूत होते.

## ॲप वर्ल्ड

### अकाऊंट नसतानाही पाठवा मेसेज




व्हॉट्सॲपने एक क्रांतिकारी फीचर आणण्याची तयारी केली आहे. आता मित्रांना, नातेवाइकांना किंवा कोणालाही व्हॉट्सप अकाउंट नसतानाही मेसेज पाठवू शकता. हे फीचर 'गेस्ट चॅट्स' म्हणून ओळखले जाते. एका वृत्तवाहिनीच्या अहवालानुसार हे फीचर सध्या बीटा टेस्टिंगमध्ये आहे आणि लवकरच सर्वांसाठी उपलब्ध होऊ शकते.

व्हॉट्सॲप वापरणारी व्यक्ती 'इनव्हाईट अ फ्रेंड' सेक्शनमधून एक सुरक्षित लिंक तयार करेल. ही लिंक एसएमएस, ईमेल किंवा इतर ॲपद्वारे शेअर करेल. समोरची व्यक्ती लिंक उघडेल तेव्हा दोन पर्याय दिसतील. एक व्हॉट्सप डाउनलोड करण्याचा आणि दुसरा 'गेस्ट' म्हणून चॅट सुरू करण्याचा. गेस्ट पर्याय निवडला तर चॅट थेट ब्राउझरमध्ये सुरू होईल. म्हणजे ॲप डाउनलोड करण्याची किंवा नंबर सेव्ह करण्याची गरजच नाही. व्हॉट्सपने सांगितले, की 'गेस्ट चॅट्स'मध्येही एंड-टू-एंड एन्क्रिप्शन असेल. प्रत्येक गेस्टसाठी युनिक आयडेंटिफायर तयार होईल. तो एन्क्रिप्शन की म्हणून काम करेल. फक्त सहभागी व्यक्तीच मेसेज वाचू शकतील. गरज पडल्यास क्यूआर कोड किंवा सुरक्षा कोड तपासून एन्क्रिप्शनची खात्री करता येईल. गेस्टला फक्त नाव टाकावे लागेल ते खरे नाव असो वा टोपणनाव; पण काही मर्यादा आहेत. 'गेस्ट चॅट्स' फक्त टेक्स्ट मेसेजसाठी आहेत.

# नंदनवनात जायलाच हवं!

भटकंती

काश्मीर... प्रवासाची, पर्यटनाची आवड असणाऱ्या मंडळींसाठी हे ठिकाण म्हणजे मस्ट व्हिजीट... दुचाकीवरून फिरणाऱ्यांसाठी काश्मीर जितकं वेगळं, तितकंच चारचाकीतून भटकंती करणाऱ्यांसाठीसुद्धा वेगळं. काश्मीरमध्ये असणारे नैसर्गिक जलस्त्रोत, तलाव, इथल्या डोंगरदऱ्या म्हणजे जणू पर्वणी.

काश्मीरमध्ये गेलं असता स्थानिक वाटाडे कायमच काही ठरलेल्या ठिकाणांवर पर्यटकांना घेऊन जातात आणि दाखवलेलं ते काश्मीर पाहूनही ही मंडळी भारावतात; पण जगाच्या नजरेआड असणारी अशीही काही ठिकाणं काश्मीरमध्ये आहेत. इथले डोंगर, दऱ्या, पाण्याचे खळखळणारे प्रवाह, नीरव शांतता सारं काही आवाक करणारं आहे.



**वारवान खोरं**

वारवान खोरं किंवा वारवान व्हॅली हे काश्मीरचं अतिशय दूर असणारं आणि सुंदर खोरं आहे. उंचच उंच हिमालय पर्वताचं जणू छत असणाऱ्या या भागामध्ये तुलनेनं पर्यटकांचा ओघ कमी. स्वच्छ पाण्याचे झरे, लाकडी घरं, हिरवीगार मैदानं म्हणजे ट्रेकिंगची आवड असणाऱ्या आणि शांततेच्या प्रेमात असणाऱ्यांसाठी एक परवणी.

**गुरेझ खोरं**

हब्बा खातून रांगेतील बर्फाच्छादित ठिकाण आणि गर्दीपासून दूर असणारी एक जागा म्हणजे गुरेझ व्हॅली अर्थात गुरेझ खोरं. किशनगंगा नदी या ठिकाणाच्या सौंदर्यात आणखी भर पाडते. मुख्य प्रवाहापासून हे ठिकाण दूर असल्यामुळं तिथं आजही पारंपरिक संस्कृती जपल्याचं पाहायला मिळतं.

**तुलैल आणि डक्सूम**

तुलैल व्हॅली ही गुरेझ व्हॅलीच्याच पुढे असून, लाकडी बांधकामाची घरं आणि डोंगरउतारावरून वाहणाऱ्या फेसाळणाऱ्या नद्या इथं वेगळीच अनुभूती देऊन जातात. इथवर पोहोचण्याचा प्रवासही थरारक आहे. डक्सुम व्हॅली हे काश्मीरमधील घनदाट जंगलांमध्ये दडलेलं एक सुंदर थंड हवेचं ठिकाण. इथल्या शांत आणि निर्मनुष्य पायवाटा कोलाहलापासून दूर नेणाऱ्या ठरतात.


**बंहस आणि लोलाब खोरं**

बंहस खोरं किंवा बंगल व्हॅली हे एक प्रचंड मोठं गवताचं मैदान आहे. त्याच्या चहूबाजूंना डोंगररांगा आहेत. निसर्गप्रेमींसाठी हे ठिकाण कमालीचा आनंद देणारं आहे. तर, लोलाब व्हॅलीला 'लँड ऑफ लव्ह अँड ब्युटी' असंही म्हटलं जातं. सफरचंदाच्या बागा, झरे, शेतं असं दृश्य पाहिलं, की जणू एखादं पोस्टकार्डच पाहतोय की काय याची अनुभूती होते. गर्दीपासून दूर असणारी काश्मीरमधील ही ठिकाणं या पर्यटनस्थळाचं असं भारावणारं रुप दाखवतात, की चित्रांमध्ये दिसणाऱ्याच एखाद्या ठिकाणी आपण आलो आहोत का, असा प्रश्न नकळतच पर्यटकांच्या मनात घर करून जातो.

# योगा सुरू करताय?

फिटनेस फंडा

सध्या फिटनेससाठी योगासनांवर भर दिला जातो. योगाचे शारीरिक आणि मानसिक असे दोन्ही लाभ आहेत. योगा केल्याने शरीर बळकट होण्यासोबतच मनही शांत होतं. बरीच तरुण मंडळी योगा क्लासला जातात. तुम्हीही नव्यानेच योगा सुरू केला असेल तर या टिप्स फॉलो करा.



* चांगला योगा प्रशिक्षक तुमच्या जगण्याची दिशा बदलू शकतो. नव्याने सुरूवात करत असाल तर योगाच्या प्राथमिक प्रशिक्षण वर्गांना जा. योगासनांमुळे तुमच्या शरीरावर होणाऱ्या परिणामांचं निरिक्षण करा. काही आसनं सुरूवातीला थोडी अवघड वाटली तरी सवयीने ती तुम्हाला नक्की जमतील.

* योगाला जाताना ढगळ, आरामदायी कपडे घाला. जीममधले कपडे योगा करताना चालणार नाहीत. योगा हा इतर व्यायामांपेक्षा पूर्णपणे वेगळा प्रकार आहे. योगा करताना शरीर ताणावं लागतं. त्यामुळे योगा पँट्सची निवड करा.

* योग वर्गांचं आयोजन केलं जातं. ठराविक वेळी हे वर्ग सुरू होतात. त्यामुळे या ठिकाणी वेळेत पोहोचणं गरजेचं असतं. जीममध्ये तुम्ही कधीही जाऊ शकता. मात्र योगाचं तसं नसतं.

* योगा करताना डिओ किंवा परफ्युमची फार गरज नसते. त्यामुळे अंगावर फार परफ्युम फवारू नका. तुमच्या परफ्युमचा सुगंध इतरांना त्रासदायक ठरू शकतो.

* तुमच्या काही विशेष गरजा असतील तर त्याबद्दल योग प्रशिक्षकाशी सविस्तर बोलून घ्या. एखादं आसन करताना त्रास होत असेल तर त्यामागची कारणं जाणून घ्या.

* जीममध्ये व्यायाम करता करता फोन वापरता येतो. मात्र योगा करताना फोन बंदच ठेवा. शांत आणि प्रसन्न मनाने योगा करा. यामुळे तुमचा संपूर्ण दिवस उत्साहात जाईल.


# स्पर्धा परीक्षेसाठी कोणती शाखा निवडावी?

स्पर्धापरीक्षा

स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने अकरावीमध्ये कोणती शाखा निवडावी हा अनेक विद्यार्थ्यांसमोर महत्त्वाचा प्रश्न असतो. कारण स्पर्धा परीक्षांद्वारे पुढे जाताना मोठी संधी आहे; परंतु निश्चितता नाही. नाही मिळाले यश तर काय?

शास्त्र शाखेचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे मजबूत 'प्लॅन बी' तयार होतो. इंजिनीअरिंग, मेडिकल, फार्मसी, कॉम्प्युटर, ॲग्रीकल्चर अशा अनेक व्यावसायिक क्षेत्रांचे दरवाजे खुले होतात. त्यामुळे स्पर्धापरीक्षेत यश न मिळाल्यास विद्यार्थ्यांसमोर करिअरचे चांगले पर्याय उपलब्ध राहतात; मात्र शास्त्र शाखेत अकरावी बारावीमध्ये अभ्यासाचा ताण मोठ्या प्रमाणावर असतो. जेईई, नीट, सीईटी अशा प्रवेशपरीक्षांची तयारी करताना विद्यार्थ्यांचा बराच वेळ त्यातच जातो. त्यानंतर इंजिनीअरिंग, मेडिकलसारख्या अभ्यासक्रमांमध्येही अभ्यास जास्त असल्यामुळे स्पर्धा परीक्षांसाठी स्वतंत्र वेळ काढणे कठीण ठरते. परंतु स्पर्धा परीक्षांमध्ये शास्त्र शाखेची पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी नाही.

अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय शिक्षण केलेले अनेक विद्यार्थी आयएएस, आयपीएस झालेले दिसतात. यामागे महत्त्वाचे कारण म्हणजे 'यूपीएससी'च्या परीक्षेची रचना. प्रिलिम्समधील सीसॅटसारख्या पेपरमध्ये तर्कशक्ती, विश्लेषण क्षमता आणि बौद्धिक चपळता यांची परीक्षा घेतली जाते. शास्त्र शाखेचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांची ही क्षमता चांगली विकसित होते. जनरल स्टडीजमधील फिजिक्स, केमिस्ट्री,



बायोलॉजी यासारखे विषय विद्यार्थ्यांना तुलनेने सोपे जाऊ शकतात. दुसऱ्या बाजूला कला किंवा वाणिज्य शाखेचा एक मोठा फायदा म्हणजे स्पर्धा परीक्षांसाठी अधिक वेळ उपलब्ध होतो. कला शाखेमुळे अकरावी-बारावीपासूनच इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र यासारखे विषय अभ्यासक्रमात असल्यामुळे स्पर्धापरीक्षांच्या तयारीमध्ये सोपेपणा येतो. वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र आणि आर्थिक व्यवस्थेची चांगली समज निर्माण होते.

शास्त्र शाखेसारखा स्पष्ट 'प्लॅन बी' नसला तरी कला आणि वाणिज्यमधूनही एमबीए, एलएलबी, अध्यापन क्षेत्र, बँकिंग, उद्योजकता किंवा इतर असंख्य करिअरच्या संधी उपलब्ध असतात. कला शाखेच्या विद्यार्थ्यांची मोठी संख्या यशस्वितांमध्ये असते. म्हणून शास्त्र, वाणिज्य आणि कला या तिन्ही शाखांना काही फायदे आणि काही मर्यादा आहेत. स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी फक्त शाखा हा निर्णायक घटक नसतो. विद्यार्थ्याची मेहनत, सातत्य, वाचनाची सवय, आकलन क्षमता आणि दीर्घकाळ अभ्यास करण्याची तयारी या गोष्टी अधिक महत्त्वाच्या असतात.

शास्त्र शाखेमार्गे जाणाऱ्या विद्यार्थ्याने पहिल्यापासून दररोजचा किमान काही वेळ नियमितपणे वाचनासाठी दिल्या स्पर्धापरीक्षांची पायाभरणी नक्कीच होईल. कला शाखेच्या विद्यार्थ्याने उपलब्ध असलेली वर्षे मेहनतीने केवळ अभ्यासाला वापरली, आव्हानात्मक विषय पक्के केल्यास 'प्लॅन बी' ची गरजच पडणार नाही. स्पर्धापरीक्षांमध्ये अपयश आले, तरी वर उल्लेखलेले मार्ग आत्मविश्वासाने चोखाळले तर आयुष्यात अपयश येणार नाही. कॉमर्सच्या विद्यार्थ्यांनी लोकसेवा आयोगाच्या परीक्षांसोबतच बँकिंग परीक्षांचा देखील विचार करावा. शिवाय फायनान्शियल सेक्टरमध्ये अन्य संधी आहेतच. त्यामुळे 'स्पर्धापरीक्षांसाठी कोणती शाखा?' या प्रश्नाचे एकच निश्चित उत्तर नसते.

जो निर्णय घेऊ त्याप्रमाणे पुढील वर्षांचे नियोजन केले की तो निर्णय बरोबर येईल. मग शाखा कोणतीही असो.

# चार्टर्ड अकाऊंटंट व्हायचेय?

करियरवाटा

चार्टर्ड अकाउंटंट (सीए) हे भारतातील प्रतिष्ठित आणि विश्वासार्ह व्यावसायिक करिअर मानले जाते. भारतीय सनदी लेखापाल संस्था (आयसीएआय) मार्फत घेतल्या जाणाऱ्या या अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना लेखाशास्त्र, लेखापरीक्षण (ऑडिट), करप्रणाली, वित्त आणि व्यावसायिक कायदे यांचे सखोल ज्ञान मिळते. त्यामुळे विविध उद्योगांमध्ये सीएंची मोठी मागणी असते.

चार्टर्ड अकाउंटंट होण्याची प्रक्रिया तीन टप्प्यांत पूर्ण केली जाते. पहिला टप्पा म्हणजे सीए फाउंडेशन परीक्षा. कोणत्याही शाखेतून बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर ही परीक्षा देता येते. यामध्ये लेखाशास्त्र, व्यवसाय कायदे, व्यवसाय गणित, तार्किक विचारशक्ती, सांख्यिकी आणि अर्थशास्त्र हे विषय असतात. ही परीक्षा दरवर्षी मे आणि नोव्हेंबर महिन्यात घेतली जाते.

फाउंडेशन परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थी सीए इंटरमिजिएट परीक्षेस पात्र होतात. ही परीक्षा दोन गटांमध्ये विभागलेली असते. पहिल्या गटात ॲडव्हान्स्ड अकाउंटिंग, कॉर्पोरेट कायदे, कॉस्ट व मॅनेजमेंट अकाउंटिंग आणि करप्रणाली हे विषय असतात. दुसऱ्या गटात ऑडिटिंग, फायनान्शिअल आणि स्ट्रॅटेजिक मॅनेजमेंट हे विषय असतात. विद्यार्थी एकावेळी एक गटही उत्तीर्ण करू शकतात.

सीए अभ्यासक्रमाचा महत्त्वाचा भाग म्हणजे तीन वर्षांची आर्टिकलशिप. या काळात विद्यार्थी अनुभवी चार्टर्ड अकाउंटंटकडे प्रत्यक्ष प्रशिक्षण घेतात. यात ऑडिट, टॅक्स फायलिंग, अकाउंटिंग आणि कायदेशीर अनुपालन यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो. तो व्यावसायिक कौशल्य विकासासाठी अत्यंत आवश्यक असतो.

सीए फायनल परीक्षा हा शेवटचा आणि महत्त्वाचा टप्पा आहे. या परीक्षेत फायनान्शिअल रिपोर्टिंग, स्ट्रॅटेजिक फायनान्शिअल मॅनेजमेंट, ॲडव्हान्स्ड ऑडिट, डायरेक्ट टॅक्स आणि इनडायरेक्ट टॅक्स हे विषय असतात. आर्टिकलशिप आणि फायनल परीक्षा यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर उमेदवार चार्टर्ड अकाउंटंट बनतो.



सीए परीक्षेत यश मिळवण्यासाठी शिस्तबद्ध अभ्यास, 'आयसीआयसी'च्या अभ्यासक्रमावर भर, नियमित पुनरावृत्ती, मॉक टेस्ट आणि उत्तर लेखनाचा सराव आवश्यक असतो. वेळेचे योग्य नियोजन आणि संकल्पनांची स्पष्ट समज यामुळे यश मिळते.

खासगी क्षेत्रात चार्टर्ड अकाउंटंटना मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. डिलॉइट, पीडब्ल्यूसी, ईवाय, केपीएमजी या 'बिग फोर' कंपन्यांसह टाटा समूह, रिलायन्स इंडस्ट्रीज, आदित्य बिर्ला समूह, इन्फोसिस, टीसीएस, विप्रो, एलअँडटी, एचयूएल, आयटीसी आणि महिंद्रा यांसारख्या नामांकित कंपन्यांमध्ये सीए कार्यरत असतात. बँका, एनबीएफसी, विमा कंपन्या, फिनटेक, फार्मास्युटिकल आणि उत्पादन उद्योगांमध्येही सीएंची गरज असते. सरकारी क्षेत्रात प्राप्तिकर विभाग, जीएसटी विभाग, रिझर्व्ह बँक, सेबी, कॅग, सार्वजनिक क्षेत्रातील बँका तसेच ओएनजीसी, एनटीपीसी, भेल, आयओसीएल यासारख्या सार्वजनिक उपक्रमांमध्ये चार्टर्ड अकाउंटंटसाठी संधी उपलब्ध आहेत. यशस्वी चार्टर्ड अकाउंटंट होण्यासाठी विश्लेषणात्मक क्षमता, गणिती कौशल्य, प्रामाणिकपणा, चांगले संवाद कौशल्य आणि ताणतणाव हाताळण्याची क्षमता आवश्यक आहे. हा अभ्यासक्रम कठीण असला, तरी दीर्घकालीन करिअर संधी, आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देतो. चार्टर्ड अकाउंटंट होण्यासाठी मेहनत आणि संयम आवश्यक असतो; परंतु या क्षेत्रात चांगली संधी आणि प्रतिष्ठा आहे. योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास यामुळे सीए होऊन उज्ज्वल भवितव्य घडवता येते.

# अहिल्यानगर तालुका माहेश्वरी सभेच्या तालुका अध्यक्षपदी गोपाल मणियार तर सचिवपदी सुरेश चांडक बिनविरोध

## सर्वसाधारण सभा उत्साहात, नवीन कार्यकारिणीची बिनविरोध निवड



नगर – अहिल्यानगर तालुका माहेश्वरी सभेची सर्वसाधारण सभा महेश मंगल कार्यालय, रामचंद्र खुंट येथे उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेला समाजातील सदस्यांची लक्षणीय उपस्थिती लाभली होती. सभेच्या अध्यक्षस्थानी उपस्थित होते तर तालुका निवडणूक अधिकारी म्हणून संगमनेर येथील सतीश बाहेती यांनी कामकाज पाहिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन कार्यकारिणीची निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये तालुका अध्यक्षपदी गोपाल मणियार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच सचिवपदी सुरेश चांडक यांचीही बिनविरोध निवड करण्यात आली.

इतर पदाधिकाऱ्यांची निवड पुढीलप्रमाणे करण्यात आली : खजिनदार – संजय कालानी, उपाध्यक्ष – ओम सोमाणी, सहसचिव – संजय भक्कड, संघटन मंत्री – मनोज जाजू.

निवडीनंतर बोलताना नूतन अध्यक्ष गोपाल मणियार यांनी आपल्या भाषणात सांगितले की, माझ्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी ही केवळ पद नसून समाजाच्या विश्वासाचे प्रतीक आहे. सर्वांना सोबत घेऊन समाजातील एकोप्याला बळकटी देणे, युवकांना संघटनेशी जोडणे आणि सामाजिक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट राहील. शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक एकजूट या क्षेत्रांत काम करण्यास प्राधान्य दिले जाईल.

माहेश्वरी समाजाची परंपरा आणि संस्कृती जपत नवीन पिढीला योग्य दिशा देणे आवश्यक आहे. सर्व सदस्यांच्या सहकार्याने आगामी कार्यकाळात अनेक विधायक उपक्रम राबविण्याचा निर्धार आम्ही करीत आहोत.

सचिव म्हणून निवड झाल्यानंतर सुरेश चांडक यांनी आपल्या भाषणात सांगितले की, संघटनेचे दैनंदिन कामकाज पारदर्शक व सुबक पद्धतीने चालविणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट राहील. सर्व सदस्यांमध्ये समन्वय साधत संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. ते पुढे म्हणाले, समाजातील विविध घटकांना एकत्र आणून सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना चालना देणे आवश्यक आहे. नवीन कार्यकारिणीच्या सहकार्याने संघटनेचे कार्य अधिक गतिमान करण्याचा आमचा प्रयत्न असेल.

सभेदरम्यान उपस्थितांनीही आपले विचार मांडले. समाजातील ऐक्य, संघटनात्मक बळ आणि युवकांचा सहभाग वाढविण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. तसेच नव्या कार्यकारिणीने समाजहिताच्या दृष्टीने कार्य करावे, अशा अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या.

नवीन कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांचे सभेत अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी उपस्थितांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या बैठकीस नंदलाल मणियार, मोहनलाल मानधना, जिल्हा सचिव अतुल डागा, जिल्हा उपाध्यक्ष रामेश्वर बिहाणी, विठ्ठल भुतडा, आर. डी. मंत्री, किसन बंग, रामेश्वर मणियार, लक्ष्मीकांत झवर, मनीष सोमाणी, अरुण झवर, बजरंग दरक, परेश बजाज, उमेश गिल्डा, भरत जाखोटीया, सुरेश सिकची आदी समाजातील सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी माजी अध्यक्ष मुकुंद धूत यांनी आभार मानले.

# अहिल्यानगरच्या डॉक्टराचा झाला आंतरराष्ट्रीय सन्मान

## डॉ. अतुल भांबळ यांना अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीकडून डॉक्टरेट



अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीकडून हॉस्पिटल मॅनेजमेंट या विषयात अहिल्यानगर जिल्ह्यातील वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. अतुल भांबळ यांना मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे.

नगर – अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीकडून हॉस्पिटल मॅनेजमेंट या विषयात अहिल्यानगर जिल्ह्यातील वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. अतुल भांबळ यांना मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या यशामुळे अहिल्यानगर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. गोवा येथे पार पडलेल्या पदवीदान समारंभात गोव्याचे माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत यांच्या हस्ते डॉ. भांबळ यांना डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीचे डायरेक्टर अनिल कुमार यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. अतुल भांबळ हे अहिल्यानगर जिल्ह्यातील वांबोरी गावचे पुत्र असून, अत्यंत साध्या शेतकरी कुटुंबातून त्यांनी आपली वाटचाल सुरू केली. प्रचंड मेहनत, चिकाटी आणि सेवाभावी वृत्तीच्या जोरावर त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. हजारो उमेदवारांमधून निवड होऊन मिळवलेला हा सन्मान त्यांच्या गुणवत्तेची आणि कार्यक्षमता सिद्ध करणारा आहे. विशेष म्हणजे, डॉ. भांबळ हे अर्धांगवायू (पॅरालिसिस) ग्रस्त रुग्णांसाठी मोफत उपचार देण्याचे कार्य सातत्याने करत आहेत. 'डॉक्टर कीट' या उपक्रमाच्या माध्यमातून त्यांनी शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील हजारो गरजू रुग्णांना निःस्वार्थ सेवा पुरवली आहे.

### विश्व नवकार महामंत्र दिनानिमित्त

# ९ एप्रिल रोजी नगरमध्ये विशेष जाप कार्यक्रम

नगर – जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो)च्या वतीने संपूर्ण भारतासह आंतरराष्ट्रीय स्तरावर ९ एप्रिल रोजी 'विश्व नवकार महामंत्र' दिवस भव्य स्वरूपात साजरा करण्यात येणार आहे. नगर शहरात यादिवशी धार्मिक परीक्षा बोर्ड येथे सकाळी ७.०२ ते ९.३६ यावेळेत नवकार जाप केला जाणार आहे. पुरूषांनी पांढरे व महिलांनी लाल वेशभूषा परिधान करून सहभागी व्हावे. यावेळी धार्मिक गीत संगीत, सांस्कृतिक कार्यक्रमही रंगणार आहेत. या विश्वव्यापी उपक्रमात ७४ जितो चॅप्टर्स, ९ झोन, ३१ आंतरराष्ट्रीय चॅप्टर्स, १०८ देश, १०८ पेक्षा अधिक धार्मिक अनुष्ठान स्थळे, ६ हजारांहून अधिक जैन देरासर, उपाश्रय, स्थानकांतून भाविक सहभागी होणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दिल्ली येथील कार्यक्रमात सहभागी होऊन लाईव्ह संबोधित करणार आहेत. एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून सामूहिक नवकार महामंत्र जपाचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे, अशी माहिती जितो अहिल्यानगरचे चेअरमन आलोक मुनोत व सेक्रेटरी तुषार कर्नावट यांनी दिली.

आनंदधाम येथे साधू साध्वीजींच्या पावन सान्निध्यात हा कार्यक्रम होणार आहे. गायक पवन नाईक व सहकारी 'नवकार नाद' तसेच धार्मिक गीते सादर करतील. कार्यक्रमानंतर केशर गुलाब मंगल कार्यालय येथे गौतम प्रसादीची व्यवस्था करण्यात आली आहे.

या आयोजनाचा उद्देश नवकार महामंत्राच्या अद्भुत शक्तीचा प्रचार व प्रसार करणे आणि अधिकाधिक लोकांना या आध्यात्मिक साधनेसाठी प्रेरित करणे हा आहे. प्रत्येकाने आपल्या शहरातील, गावातील प्रमुख धार्मिक स्थळे, समाज, व्यक्ती आणि श्रद्धाळूंना या महान कार्यात सहभागी घ्यावे. स्थानिक पातळीवर जास्तीत जास्त भाविकांनी नजीकच्या स्थानकात किंवा घरी बसूनही माळ जपावी.

देशातील दिग्गज राजकारणी, मोठे उद्योजक, बॉलिवूड स्टार, दिग्गज खेळाडू, सेलिब्रिटींही यात सहभागी होणार आहेत. अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे की नवकार महामंत्राची शक्ती आणि महत्त्व आज जागतिक स्तरावर मान्यता मिळवत आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमात अधिकाधिक भाविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन जितो लेंडीज विंग चेअरमन संगिता मुथियान, सेक्रेटरी अंशु मुनोत, युथ विंग चेअरमन चेतन भंडारी, सेक्रेटरी यश भंडारी यांनी केले आहे.




महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अहिल्यानगर शहर शाखेची नवीन कार्यकारणी नुकतीच अहिल्यानगर जिल्हा कार्याध्यक्ष मधुकर अनाप यांच्या प्रमुख उपस्थितीत निवडण्यात आली.

# अहिल्यानगर शहर अंधश्रद्धा निर्मूलन समिती अध्यक्षपदी संतोष कदम

## कार्याध्यक्षपदी राजेंद्र कर्डिले, उपाध्यक्षपदी रवी सातपुते व नीता बर्वे यांची सर्वानुमते निवड, समितीची कार्यकारणी जाहीर

नगर – डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अहिल्यानगर शहर शाखेची नवीन कार्यकारणी नुकतीच अहिल्यानगर जिल्हा कार्याध्यक्ष मधुकर अनाप यांच्या प्रमुख उपस्थितीत निवडण्यात आली. शहर अध्यक्षपदी संतोष कदम तर कार्याध्यक्षपदी राजेंद्र कर्डिले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

उपाध्यक्ष रवी सातपुते व नीता बर्वे, सचिव रजनी ताठे, सहसचिव विक्रम क्षीरसागर, बुवाबाजी संघर्ष विभाग नलिनी गायकवाड व महेश धनवटे, वैज्ञानिक जाणीवा प्रकल्प विभाग रमेश भांड व रेखा भिंगारदिवे, वार्तापत्र व प्रकाशन विभाग आनंद गोलवड व विजय शिंदे, मानसिक आरोग्य विभाग विजय चव्हाण व ॲड. गीता कटारिया, महिला सहभाग विभाग प्रा. सोनाली शिंदे, युवा विभाग आनंद गांधी, विवेक वहिनी विभाग प्रा. शंकर मोरे व डॉ. प्रशांत शिंदे, प्रशिक्षण विभाग हरेश्वर साळवे व दिलीप जगताप, सांस्कृतिक विभाग ॲड. मोनाश्री आहेर, सोशल मीडिया आणि प्रसिद्धी विभाग लोकेश बर्वे व मुशीर शेख, जाती अंत विभाग रिजवान शेख व रवींद्र कांबळे, विविध उपक्रम विभाग मंगेश पालवे व नामदेव पवार, कायदा विभाग ॲड. विद्या शिंदे व ॲड. सविता नगरे.

नगर शहर व परिसरातील शाळा महाविद्यालयांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, जादूटोणाविरोधी कायदा, वैज्ञानिक जाणीवा प्रकल्प अभियान, विवेक वाहिनी विभागामार्फत कार्यक्रम घेऊन अंधश्रद्धा व अनिष्ट रूढी परंपरा दूर करण्यासाठी शाखेच्या वतीने प्रबोधन व प्रयत्न करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यकारिणी सदस्यांचे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष अरुण कडू पाटील, महाराष्ट्र राज्य अध्यक्षा प्रमोदिनी मंडपे, सरोजमाई पाटील तसेच राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ. हमीद दाभोळकर, मुक्ता दाभोळकर, प्रवीण देशमुख, गणेश चिंचोले, राहुल थोरात, मिलिंद देशमुख, मधुकर गायकवाड, अशोक कदम, श्रीपाल ललवाणी, अण्णा कडलास्कर, नंदिनी जाधव, रामभाऊ डोंगरे आदींनी अभिनंदन केले आहे.

# अपघातग्रस्त वाहनास नुकसान भरपाई नाकारणाऱ्या विमा कंपनीस चपराक


## तक्रारदारास व्याजासह नुकसानभरपाई अदा करण्याचे ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे आदेश

नगर – अपघातग्रस्त चार चाकी वाहनास नियमानुसार नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ करणाऱ्या विमा कंपनीला अहिल्यानगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने चपराक लगावली आहे. वाहन धारक तक्रारदारास विमा दावा नाकारण्याच्या दिनांकापासून प्रत्यक्ष विमा रक्कम अदा करणे पर्यंत मूळ नुकसान भरपाई रक्कम १ लाख ४३ हजार २६१ रूपये व त्यावर वार्षिक ९ टक्के व्याजदराने रक्कम अदा करावी तसेच तक्रारदारास मानसिक क्लेश व त्रासापोटी २५ हजार रुपये आणि तक्रार खर्चापोटी १० हजार रुपये अदा करण्यात यावेत असे आदेश जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष सादीक अली बशीर सय्यद, सदस्या चारू विनोद डोंगरे, सदस्या संध्या श्रीपती कसबे यांनी २५ मार्च २०२६ च्या निकालपत्रात दिले आहेत. या प्रकरणात तक्रारदाराच्या वतीने ॲड. सचिन चांगदेव इथापे यांनी युक्तिवाद केला.

सविस्तर माहिती अशी की, तक्रारदार सचिन चंद्रभान सातपुते (वय ३३, धंदा– शेती व व्यापार, रा. अवचित वाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) यांनी वैयक्तिक, कौटुंबिक, शेतीसंबंधी कामासाठी बोलेरो चार चाकी वाहन मूळ मालक अशोक वसंत मांडेकर यांच्याकडून खरेदी केले होते. सातपुते यांनी वाहन नोंदणी व रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनीकडून विमा पॉलिसीही निर्धारित शुल्क अदा करून हस्तांतरित करून घेतली. त्यानुसार तक्रारदाराच्या वाहनास २५ फेब्रुवारी २०२० अखेर विमा संरक्षण प्राप्त होते. यादरम्यान १७ फेब्रुवारी २०२० रोजी तक्रारदार नातेवाईकांसह नाशिक येथून परतत असताना मध्यरात्री १ च्या सुमारास सिन्नर बायपास नजीक समोरून येणाऱ्या वाहनाची धडक होऊन अपघात झाला. यात तक्रारदाराच्या वाहनाचे मोठे नुकसान झाले. समोरच्या गाडीचे चालक प्रवीण जाधव यांनी तक्रारदारास मारहाण करून स्वतःच्या गाडीच्या नुकसान भरपाईपोटी तक्रारदाराकडूध १ लाख २० हजार रुपये घेतले. यांनतर तक्रारदाराने स्वतःचे वाहन दुरुस्तीसाठी संगमनेर येथील एस.एम. ऑटो वर्ल्ड येथे २२ फेब्रुवारी २०२० रोजी दुरुस्तीसाठी दाखल केले. २४ फेब्रुवारी २०२० रोजी तक्रारदाराने विमा कंपनीला रितसर क्लेम फॉर्म भरून दिला. विमा कंपनीच्या अधिकृत सर्व्हेअरने ५ मार्च २०२० रोजी वाहनाची प्रत्यक्ष पाहणी करून १ लाख ७२ हजार ४४५ रूपयाचे नुकसानीचे प्राथमिक अंदाजपत्रक नोंदवले. दरम्यान मार्च २०२० मध्ये कोविड महामारी मुळे सर्वत्र लॉकडाऊन लागले. लॉकडाऊन शिथिल झाल्यानंतर तक्रारदाराने शोरूममध्ये चौकशी केली असता वाहन दुरुस्त झाले असून दुरूस्ती खर्च १ लाख ४३ हजार २६१ रूपये विमा कंपनीने दिला नसल्याचे सांगण्यात आले. तक्रारदाराने चौकशी केली असता विमा कंपनीने १८ मार्च २०२० रोजी विमा दावा नाकारल्याचे सांगण्यात आले. तक्रारदाराने नियम भंग करून संबंधित वाहन व्यावसायिक कारणासाठी केल्याचा दावा विमा कंपनीने केला. यानंतर तक्रारदाराने जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे तक्रार दाखल केली. दोन्ही बाजूंनी जोरदार युक्तिवाद करण्यात आला. विमा कंपनीने वाहन दुरुस्तीचे मूळ बिल सादर न केल्यामुळे अंतिम सर्व्हे पूर्ण होऊ शकला नाही व त्यामुळे विमा दावा नाकारला असे कारण दिले. तसेच वाहनाचा व्यावसायिक वापर झाला असल्याच्या युक्तिवाद केला. परंतु तक्रारदाराच्या वतीने हा दावा खोडून काढण्यात आला. विमा कंपनीलाही वाहनाचा व्यावसायिक वापर झाल्याचे पुराव्यानिशी सिद्ध करता आले नाही. मूळ बिल न मिळाल्याने विमा दावा नाकारला हा विमा कंपनीचा मुद्दा वैध ठरणारा नसल्याचे आयोगाने स्पष्ट केले. तक्रारदाराने अपघाताची एफ आय आर नोंदवली नाही हा विमा कंपनीचा बचावही अमान्य करण्यात आला. प्रत्येक अपघातात एफ आय आर नोदवणे अनिवार्य नसल्याचे आयोगाने स्पष्ट केले.

दोन्ही बाजूंच्या युक्तिवादांनतर ग्राहक आयोगाने निकालात नमूद केले की, तक्रारदारांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे. विमा कंपनीने तक्रारदारास संबंधित अपघाताबाबत वाहनाच्या नुकसानी पोटी १ लाख ४३ हजार २६१ रूपये अदा करावेत, नुकसान रकमेवर दावा नाकारण्याच्या दिनांकापासून प्रत्यक्ष रक्कम अदा करेपर्यंत वार्षिक ९ टक्के व्याजदराने रक्कम अदा करावी, तक्रारदारास मानसिक त्रासापोटी २५ हजार रुपये व तक्रार खर्चापोटी १० हजार रुपये अदा करावेत.

# 'भिमसैनिक खूनप्रकरणी' पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण




भमसैनिक नितीन शिरसाठ यांच्या निर्घृण खूनप्रकरणातील फरार आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी स्वाभिमानी आंबेडकरी चळवळीच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले.

नगर – भिमसैनिक नितीन शिरसाठ यांच्या निर्घृण खूनप्रकरणातील फरार आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी स्वाभिमानी आंबेडकरी चळवळीच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले. या उपोषणात रिपब्लिकन पक्ष (गवई) चे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, संपदा म्हस्के, प्रतीक बारसे, विजय शिरसाठ, ज्योती पवार, निलेश शिरसाठ, प्रतीक शिरसाठ, शशिकांत गायकवाड, सोनू जाधव, तात्या शिरसाठ, भावड्या कुऱ्हाडे, विक्रम आंग्रे, राकेश आल्हाट, संतोष लोंढे, प्रवीण गायकवाड, सुजय पाटोळे, विशाल गायकवाड आदींसह समाजबांधव सहभागी झाले आहेत.

या घटनेतील आरोपींना राजकीय वरदहस्त असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई होत नसल्याचा गंभीर आरोपही आंदोलनकर्त्यांनी केला आहे. आंदोलकांच्या म्हणण्यानुसार, आरोपींचे अचूक लोकेशन वारंवार पोलिसांना देऊनही त्यांना अटक करण्यात आलेली नाही. त्यामुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आरोपींना राजकीय दबावातून वाचवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करत, या प्रकरणातील तपासाबाबत पारदर्शकता राखावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, या आरोपींवर यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून, ते सराईत गुन्हेगार असल्याचे पुरावे पोलीस प्रशासनाला सादर करण्यात आले असल्याचे आंदोलकांनी नमूद केले. असे असतानाही दीड महिन्यांहून अधिक काळ लोटूनही अटक न होणे ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रकरणाचे तपास अधिकारी यांनी आतापर्यंत नेमका काय तपास केला, किती पथके तयार करण्यात आली, याबाबतची सविस्तर माहिती फिर्यादीला तात्काळ द्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. तसेच, या प्रकरणाचा तपास निर्भीड आणि सक्षम अधिकाऱ्याकडे सोपवून आरोपींना लवकरात लवकर अटक करावी, अशी मागणी करण्यात आलेली आहे.

# अमृत संस्थेतर्फे लक्षित गटाचे 'राज्यव्यापी परिवार सर्वेक्षण'

## ८ ते २५ एप्रिलदरम्यान ३६ जिल्ह्यांत मोहीम

नगर – राज्य शासनाची स्वायत्त संस्था असलेल्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात अमृत संस्थेकडून राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ८ ते २५ एप्रिल या कालावधीत राज्यभर परिवार सर्वेक्षण राबविण्यात येणार आहे, अशी माहिती अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी दिली आहे.

राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये हे अभियान राबविले जाणार असून या माध्यमातून लक्षित गटातील कुटुंबांची संख्या निश्चित करणे, त्यांच्या अपेक्षा जाणून घेणे तसेच त्यांच्यासाठी नवीन योजना तयार करणे हा या सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश आहे.

ज्या खुल्या प्रवर्गातील जातींना कोणत्याही स्वतंत्र शासकीय विभाग, संस्था किंवा महामंडळांमार्फत योजनांचा लाभ मिळत नाही, अशा घटकांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी अमृत संस्था कार्य करते. सद्यस्थितीत या संस्थेच्या लक्षित गटामध्ये ब्राह्मण, सिंधी, हिंदू मारवाडी, गुजराती, पटेल, राजपूत, राजपुरोहित, हिंदू नेपाळी, बनिया, कम्मा, कायस्थ, अय्यंगार, नायर, नायडू, पाटीदार, बंगाली, भूमिहार, येलमार, ठाकूर, त्यागी, सेनगूनथर, जाट, कानबी, कोमटी, वैश्य अशा २५ जातींचा समावेश आहे. सर्वेक्षणानंतर यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

या समाजातील युवक–युवती व इतर उमेदवारांसाठी व्यक्तिमत्त्व विकास, औद्योगिक व उन्नत कौशल्य विकास, रोजगारक्षम कौशल्य विकास, उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक अर्थसाहाय्य, स्पर्धा परीक्षा प्रोत्साहन व उद्योग व्यवसाय वृद्धीसाठी वैयक्तिक व्याज परतावा योजना राबविल्या जातात. भविष्यात या योजनांची व्याप्ती वाढविण्यासाठी व मूल्यवर्धित योजना तयार करण्यासाठी हे सर्वेक्षण उपयुक्त ठरणार आहे.

### सर्वेक्षणाचा कालावधी आवश्यकता वाटल्यास वाढविला जाऊ शकतो

या काळात अमृत संस्थेचे प्रतिनिधी लक्षित गटाशी संपर्क साधणार आहेत. समाजातील विविध सामाजिक संस्था, संघटना व मंडळे यांच्याकडूनही प्रातिनिधिक स्वरूपात माहिती संकलित केली जाणार आहे. लक्षित गटातील जास्तीत जास्त व्यक्ती, संस्था व संघटनांनी अमृतच्या प्रतिनिधींशी संपर्क साधून आपली नोंदणी करावी व अमृत संस्थेच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी नागरिकांनी मुख्यालयाच्या ९७३०१५१४५० किंवा ९११२२२६१५४ या क्रमांकांवर तसेच संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर संपर्क साधावा, असे आवाहनही श्री. जोशी यांनी केले आहे.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अस्मिता बॅनर्जी यांना पीएच.डी पदवी प्रदान



कु. अस्मिता बॅनर्जी यांना नुकतीच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी (डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी) पदवी प्रदान करण्यात आली. यानिमित्ताने संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

नगर – येथील आयएमएस रिसर्च सेंटरच्या विद्यार्थीनी कु. अस्मिता बॅनर्जी यांना नुकतीच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी (डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी) पदवी प्रदान करण्यात आली. यानिमित्ताने संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी संस्थेचे उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. प्रोणोती तेलोरे, प्रबंध मार्गदर्शक डॉ. ऋचा तांदुळवाडकर, रिसर्च सेंटरचे प्रमुख डॉ. राहुल खंडेलवाल उपस्थित होते.

अस्मिता बॅनर्जी यांनी आपल्या प्रबंधासाठी पुणे जिल्ह्यातील ऑनलाइन शिक्षण सेवांबाबत ग्राहकांच्या वर्तनाचा अभ्यास हा विषय निवडला होता. या प्रबंधामध्ये ऑनलाईन अभ्यासक्रमांची रचना कशी करावी तसेच त्याचा विद्यार्थी, शासन आणि उद्योगक्षेत्राला अधिकाधिक कसा लाभ होऊ शकतो याविषयी सखोल अभ्यास करण्यात आला आहे.

या संशोधन कार्यासाठी त्यांना प्रबंध मार्गदर्शक डॉ. ऋचा तांदुळवाडकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच बाह्य परीक्षक म्हणून डॉ. सारंग भोला आणि डॉ. हेमंत काटोळे यांनी काम पाहिले.

